# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ८/५/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०२) इतिवृत्त

**मंगळवार** दिनांक **०८ मे २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.त्र्यंबक गणपतराव तुपे** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी ११.५० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
2. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
3. श्री. पुनमचंद सोनाजी बमणे
4. श्री. मधुकर दामोधर सावंत
5. श्री. हिंमतराव साळूबा दाभाडे
6. श्री. मो. जावेद मो. इसाक
7. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान
8. श्री. अ. रशीद खान (मामु)
9. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
10. श्री. संजय रामदास जोशी
11. श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
12. श्री. पुरूषोत्तम रघुवीरसिंग ठाकुर
13. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
14. श्री. अ. साजेद अ. सत्तार

**संवाद :**

श्री.संजय सिरसाट : सभापती यांचे अध्यक्षतेखाली ही पहिलीच बैठक होत असून पहिल्यांदा चर्चा घेण्यात यावी अशी विनंती करतो. गेल्या १५ दिवसापासून दोन प्रश्न गंभीरपणे सर्वच वृत्तपत्रांमध्ये जनतेमध्ये उत्सकतेचे आहेत.झालेल्या घटना हया निदंनीय असल्यामूळे सचिवांनाही विनंती करेल की जेही आजच्या बैठकीत कामकाजहोणार आहे त्या संपूर्ण कामकाजचे इतिवृत्तात नोंद घेण्यात यावी.एक शब्द न शब्द इतिवृत्तात यावा. या सभागृहात झालेली चर्चा  निर्णय त्यात ड्रेनेज किंवा सिध्दार्थ उद्यानातील काळवीटचा विषय असेल त्या बाबतीत प्रशासनाने केलेली कार्यवाही या संदर्भात चर्चा होणार आहे.मा. आयुक्तासह सर्वज्ञ उत्तर देणार आहे. समाधानकारक उत्तर मिळाले नाही किंवा सभागृहातील चर्चा मला समाधानकारक वाटली नाही तर, मा.उच्च न्यायालयात दाद मागावी लागेल. अदयापपर्यत मा.आयुक्त सभागृहात उपस्थित नाही. पाच मिनीटे आयुक्तांची वाट बघावी. त्यानंतर चर्चेला सुरूवात करावी.

मा. सभापती : मा.आयुक्त उपस्थित झाल्यानंतर चर्चेला सुरूवात करण्यात येईल.

(मा. आयुक्त दुपारी १२.१० वा. सभागृहात उपस्थित होतात.)

श्री.संजय सिरसाट : गेल्या १५ दिवसापासून वृत्तपत्रात बातम्या येत आहे. मा.आयुक्तांनी अनेक वेळा त्या संदर्भात स्पष्टीकरणही दिलेले आहे. आज स्थायी समितीची बैठक आहे. काय रणनीती ठरवायची म्हणून वेगवेगळया पक्षाचे लोक आपआपल्या कॅबीनमध्ये बैठका घेत असतात, ते रूटीनमध्ये होत असते. सभागृहात येत असतांना अनेक लोक, सदस्य नव्हे, पॅसेजमध्ये होते. काही लोकांनी घोषणाही दिल्या त्या काय दिल्या त्याच्याशी काही घेणे-देणे नाही. महानगरपालिकेत आलो व स्थायी समिती किंवा सर्वसाधारण सभा असेल आणि एखादा विषय येणार असेल तो कोणत्या जतीच्या धर्माच्या व्यक्तीचा आहे हे पहिल्यांदा ठरवले जते. जर तो व्यक्ती दलित असेल तर दलिताच्या बाजूने, जर हिन्दू असेल तर हिन्दुच्या बाजूने, जर मुस्लीम असेल तर मुस्लीमाच्या बाजुने बोलणारे लोक जमा होतात. ते सर्व उघड्या डोळयांनी आपण पाहतो. मी कोणत्याही एका धर्माबद्दल बोलत नाही, कोणत्याही धर्माचा व्यक्ती महानगरपालिकेत काम करून रोजी रोटी कमवित असेल तर त्यांनी काम सुध्दा व्यवस्थीत केले पाहिजे एका भूमीपुजनाच्या ठिकाणी गेलो, अधिकाऱ्यानी चांगले वाक्य वापरले होते की आयुक्त म्हणतात की, दिल से लो लेकीन दिल पे मत लो. कभी दिमागसे भी काम करो महानगरपालिकेमे. काही वेळा बुध्दीचा वापर करून काम केले पाहिजे असाच प्रकार मागील आठवडयात झालेला आहे. सिध्दार्थ उद्यानची बातमी ही महाराष्ट्रच नव्हे तर जगतिक पातळीवर गेलेली आहे. काहींनी मा.श्रीमती मेनका गांधी यांना त्या बाबतीत पत्रही दिलेले आहे. माझ्या माहिती प्रमाणे पुढील आठवडयात त्या महापालिकेस भेट देणार आहेत. एखादा आजर झाला असेल त्यामुळे हरीण मृत्यु पावले तर समजून घेतले असते. परंतू एका पाठोपाठ एक, दोन, तीन, चार असे एकूण १३ ते १४ हरीण मृत्यूमुखी पडले. पेपरला बातमी आली की कोणत्याही मा.पदाधिकारी, मा.आयुक्तांना याची माहिती दिली गेली नाही. प्रशासकीय बाब होती पदाधिकाऱ्यांना माहिती दिली नसेल समजू शकलो असतो. परंतू मा.आयुक्तांना सुध्दा माहिती दिली गेली नाही. एखादा आजर आला त्यामूळे मृत्यू झाला असेल असे वाटले नंतर असे कळाले की जे मृत्यूमूखी पडले त्यांना दफनही केले. ते करीत असतांना वन विभागास कळविले नाही हरणाची देखभाल करणारे त्यांचे काय. निलंबन, सेवासमाप्ती हे मा.आयुक्त करताय, कर्मचारी शेतावर कामावर होते म्हणून त्यांना आयुक्तांनी निलंबीत केले असे वृत्तपत्रात आले. ते कूठे काम करीत होते हे माहित नाही. दुसऱ्यादिवशी बातमी आली की जे हरीण दफन केले तेथील सिंगेच गायब आहे.यावर मा.आयुक्तांनी एका अधिकाऱ्याला १३-१४ हरीण कशामुळे मृत्यू पडले याची चौकशी करावी म्हणून जबाबदारी दिली. ते अधिकारी कार्यकारी अभियंता संबधीत अधिकारी यांना लाईट ड्रेनेजची माहिती त्यांना हरीण कशामुळे मृत्यू झाले याची चौकशी देणे कितपत योग्य आहे. संबधीत अधिकारी यांनी अहवाल सादर केल्यानंतर पुन्हा बातमी आली, गंभीर स्वरूपाचा गुन्हा झाला, की जेंव्हा पासून हा विभाग कार्यरत आहे तेंव्हापासून अनेक वाघ, हत्ती तसेच इतर ही प्राणी मृत्यू पावले त्याची कातडी तेथे सापडली. वाघाच्या नखाची किमंत स्मगलींगच्या बाजरात फार मोठी असते अशी माझी माहिती आहे. माझा आरोप असा आहे की जे आजपर्यंत वाघ, हत्ती मृत्यू पावले

त्यांचे दात, नखे आजपर्यंत प्राणी संग्रहालय विभागात कशासाठी ठेवले होते. हा एक स्मगलींगचा भाग आहे मी फक्त चर्चा सुरू केलेली आहे. मला मा.आयुक्तांच्या बद्दल शंका घेण्याचे कारणच नाही. कारण आयुक्त कार्यवाही करण्यास तत्पर आहेत. मागिल सर्वसाधारण सभेत एक सदस्यांनी रॉकेल अंगावर घेतले होते तर ७-८ सेक्युरीटींना नोटीसेस देवून टाकल्या. आठ मजूर यांचेवर निलंबानाची कार्यवाही झाली परंतू जे जबाबदार आहेत त्यांचेवर काय कार्यवाही केली व झालेला प्रकार नेमका काय होता आहे याचा आयुक्तांनी खुलासा करावा.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी या बाबतीत सविस्तर खुलासा करावा.

मा. आयुक्त : स. सदस्य यांनी चार मुद्दे उपस्थित केले आहे. १० ते १५ दिवसापासून जे प्रांणी संग्रहालयाच्या बाबतीत जे येत आहे त्यात तीन मूद्दे आहे . पहिला मुद्या असा की हरीण कशामूळे मृत्यूमूखी पडले.याचा अहवाल कार्यकारी अभियंता यांचेकडून मागविला आहे. त्यांना ड्रेनेज लाईटची माहिती आहे परंतू सभागृहाला सांगू इच्छितो की सर्वात मोठा विषय असा होता की १२ हरीण मृत्यूमूखी पडतात तरीही आयुक्तांना माहिती नाही, मा.महापौर मा. सभापती, मा.पदाधिकारी यांचेकडे माहिती दिलेली नाही. एक प्रकारे मुख्य कार्यालयास माहिती दिली नाही. १७ मार्च पहिल्या हरणाचा मृत्यू झाला.त्याची माहिती २६ एप्रिलला मुख्य कार्यालयात मिळाली. ऑफिस प्रोसीजर मध्ये हलगर्जीपणा झालेला आहे. त्याची जबाबदारी निश्चित करायची होती. पहिल्या हरीणाचा मृत्यू १७ मार्च झाला दुसरे २७ मार्चला नंतर ११ एप्रिलला काही हरणाचा मृत्यू झाला तर ही माहिती २६ एप्रिलच्या पूर्वी का कळविण्यात आलेली नाही. त्यांचे बद्दल जे प्रासीजर करावयास पाहिजे जे की सेन्ट्रल झू ऑथॉरीटीचे जे डायरेक्शन असतात जेंव्हाही वन्य प्राण्यांचा मृत्यू होतो त्यावेळी काय प्रोसेस करावयास पाहिजे ती करण्यात आलेली आहे काय, दुसरे असे की महानगरपालिकेच्या प्रोसीजरनुसार कार्यवाही झालेली आहे काय त्याबध्दल चौकशी करण्याचे आदेशीत केले होते हरीण का मृत्यूमूखी पडले या बद्दल त्यांना आदेशीत केलेले नव्हते. हरीण का मृत्यूमूखी पडत आहे त्यांना कोणत्या प्रकारची डिसीज झालेली आहे या बद्दल ऑलरेडी परभणीचे डॉक्टर तपासणी करीत होते. मा. महापौराशी चर्चा केल्यानंतर मुंबईचे डीन यांना बोलवून घेतले त्यांनी टेक्नीकली सांगितले की हरीणाला नेमक्या कोणत्या प्रकारची डिसीज झालेली आहे. कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे अहवालात म्हटले की १७ मार्चला एक हरीण मृत्यू पावले. एक महिन्यानंतर प्रशासनास कळविले त्यात दिरंगाई झालेली आहे. ते वेळीच कळविले असते तर नंतर जी मुख्य कार्यालयाने कार्यवाही सूरू केली परभणीचे डॉक्टर पूर्वी येवू गेले होते. परंतू मुंबईचे डीन यांना बोलवून घेतले विनंती केली त्यामूळे त्यास जे इफेक्टस् मिळाला तो पूर्वी मिळाला असता तर जस्त चांगले झाले असते.हे दोन त्यांचे फायडींग्स होते. त्यावर संचालक, प्रांणी संग्रहालय यांचे एक वेतनवाढ रोखलेली आहे. दुसऱ्या दिवशी असे समजले की तेथे मा. सभापती व काही नगरसेवक गेलेले होते. तेथे आठ कर्मचारी विना परवानगी गैरहजर होते. एवढीच विचारणा केली की, त्यांनी कोणाची परवानगी घेतली का, त्यांनी परवानगी घेतली नव्हती. मा.महापौर यांनीही पाहणी केली. त्यांनी सुध्दा जहीर केले होते की, कडक कार्यवाही या कर्मचाऱ्यांवर केली जईल. त्या आधारे प्रशासनाने त्या

कर्मचाऱ्याना तातडीने निलंबीत केलेले आहे. जे कर्मचारी निलंबीत झाले त्यांना सात आठ दिवसात त्याचे म्हणणे मांडण्यासाठी मुदत आहे. जर ते खरोखरच अधिकाऱ्याकडे गेले होते म्हणून गैरहजर होते असे त्यांनी सांगितले तर तात्काळ कार्यवाही होईल. दुसरे असे की जे हरीण दफन केले आहे त्यांचे सिंग तसेच इतर बॉडी पार्टस् गायब आहे असे स. सदस्यांनी म्हटले जेव्हा कार्यकारी अभियंता यांना चौकशी करण्याचे दिले त्यांनी तीन मृतदेह काढले होते. त्यांना ते दिसले होते. त्यांचे सजेशन असे होते की पूर्ण काढावयास पाहिजे व ते मृतदेह जळून टाकावयास पाहिजे सेन्ट्रल झू ॲथॉरीटीच्या नूसार दफन करू शकतो किंवा जळू शकतो. हे करीत असतांना संचालक प्रांणी संग्रहालय यांचे उपस्थित अत्यंविधी करावयास पाहिजे त्यांचे उपस्थितीतच झालेले होते. डेड बॉडी काढल्यास काही लिगल अडचण आहे काय वन विभागाकडे विचारणा केली कारण प्राण्यांचे मालक शासन असते. महापालिका नुसती त्यांची कस्टोडीयन असते. वन विभागाने म्हटले की ते पूर्ण तपासणी करून घ्यावे लागेल. लेखी विचारणा करतो म्हणून मी म्हटले व कायद्याची काही अडचण नसेल तर दफन केलेले पूर्ण डेड बॉडी बाहेर काढून पंचनामा करून जळले जईल. वन विभागाच्या सजेशनची अभिप्रायाची वाट बघत आहे. सर्व प्रथम असे सांगण्यात आले की जे आहे ते स्कीनच्या बॅक्टरल इन्फ़ेक्शनच्या मुळे झालेले आहे. बॅक्टरीया जे आहे ते सॉईल बॉर्नमुळे होतात. प्राणी संग्रहालय विभागाने सॉईल ट्रीटमेंन्ट सूरू केली होती. डीन यांनी म्हटले की सेक्नड रीजन इन्फेक्शन आहे प्रायमरी रीजन असे आहे की त्या प्राण्याच्या शरीरामध्ये झींकची कमी झाली होती. निष्कर्ष काढला की पापुलेशनचा विचार करून सन २००४ च्या नंतर कोणतेही जन्मले नव्हते. त्या दिवशीपर्यत ११ मृत्यूमूखी पडले त्यात २ मादी ९ नर होते. त्यांनी म्हटले की झिंक कमतरतेमुळे, कारण मादी पेक्षा नराला दुप्पट प्रमाणात झींक लागते. मागचा हिस्सा जे आहे हिडलिंगचा आहे. मागिल जे पाय असतात त्यामध्ये जस्त असते. आणखी स्कीन ती कटलेली आहे. झींकचे एक काम असते स्कीनची कन्टीन्युटी मेंटेन करणे. या दोन तीन ऑब्झर्वेशनवर आहेत. स्कीन तुटली होती. मागचा भाग त्यात मध्ये जस्त होते. तिसरे इन्फर्टेलिटी आणि चौथा नराला जस्त इंफेक्ट केले होते त्या अधारे सांगितले की हे झींक डिपेरन्सीचे सिन्ड्रॉम आहे. ॲन्टी बॅक्टरीयल ट्रीटमेंट जे आहे त्यात पाण्याचा वापर कायम ठेवा.कारण तो सेकंड दर्शनी इन्फेक्शन आहेतच पण प्रायमरी कॉजला दूर करण्यासाठी तुम्ही झींक सप्लीमेंन्ट व झींक ज्यामुळे बनते त्या प्रोटीनचे नाव सांगितले तसेच सोयाबीनची जस्त मात्रा वाढवावी. हस्तीदंताचा पुर्वीपासूनचा साठा होता. रात्री आठ वाजता समजल्यानंतर मी स्वत: व मा.सभापती, मा.महापौर सुध्दा होते. बाकीचे नगरसेवक व मा.सभागृह नेता ही होते. त्यावेळी दोन निर्णय घेतले की जे साठा आहे तो हेड कार्यालयाने ताब्यात घ्यावा. ते तपासणी करून घ्यायला पाहिजे की तो रेकॉर्डशी मिळता जूळता आहे काय दुसरे असे की वन विभागास हॅंडओव्हर करू या. संचिका बघीतली असता सन २००१ ला सेन्ट्रल झू ॲथारीटीचे जे डायरेक्शन आहे त्यानुसार जे साठा आहे तो वन विभागाकडे हस्तांतर करावे. त्याबद्दल झू चे २००१ चे एक पत्र होते. तसेच जुलै महिण्याचे एक आयुक्तांचे पत्र होते की झु विभागाने या बाबत कार्यवाही करावी. संचिकेवरून असे दिसून येते. ४-५ रिमांइडर दिलेले आहे. त्यांनी सन २००३ पर्यंत

पत्र व्यवहार केला त्यानंतरचे पत्र किंवा रिमांडर दिसून येत नाही. महापालिकेने प्रांणी संग्रहालयाचे संचालक यांनी सी एफ ला पत्र दिले आहे की हे साठा ताब्यात घ्यावा. एक पत्र दिसून आले की डीसीएफ चे पत्र आहे की जे साठा आहे त्याची पूर्ण पूर्तता करून घेणार नंतर ताब्यात घेणार. सीएफओ साहेबाशी बोलणे झाले. त्यांनी एक एसीएफ ची समिती केली. २४ तासाने आपण जे साठा आहे तो वन विभागास हस्तांतर केलेला आहे. माहिती प्रमाणे चौकशी पूर्ण झाली असून अहवाल अदयाप प्राप्त नाही.ज्या दिवशी साठा बघीतला होता. यानूसार रेकॉर्ड प्रमाणे संख्या बरोबर होती. वन विभागाने घेतलेला ताबा हा पूर्ण मेजरमेंन्ट फोटो काढून घेतलेला आहे.आपल्या विभागाची चूक झालेली आहे कळविले नाही. झींक डिपेन्सी झाली कशी म्हणजे कुठेतरी आहारामध्ये झिंक डिपीसीयन्ट असेल.आहारा बद्दल व प्रोसेस बद्दल जे मूद्दे आहे त्यासाठी दोन दिवसापूर्वी एक कमेटी नियुक्त केलेली आहे. असे पुन्हा घडू नये कारण दोन वर्षापासून हळू हळू ही डिसीजपसरत होती ते आपणास कळाले नाही. पूढे ठेवायला पाहिजे होते की काही तरी गडबड आहे. महानगरपालिकेच्या सीस्टीम मध्ये काय चूक झालेली आहे काय यासाठी कमेटी नियुक्त केली. एक महिण्यात आमच्या सिस्टीममध्ये काय चुकले याबाबत व कसे इंम्प्रुव्हमेंट करावयास पाहिजे ते अहवाल सादर करणार आहे. जे डॉक्टरचे रिपोर्ट होते ते आलेले आहे. वन विभागाचा अहवाल येईल. त्यामध्ये जे निष्कर्ष काढले जतील त्या अधारे कडक कार्यवाही केली जईल.

श्री.संजय जेशी : यात दोन वेगवेगळे विषय आहेत. वन खान्याने अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल केला. वाइल्ड लाईफ ॲक्टप्रमाणे गुन्हा दाखल केला. जी जबाबदारी वन विभागाची होती त्यांनी तातडीनेकार्यवाही केली. हरणाचा मृत्यू झाल्यानंतर प्रशासनास मूळात एक महिना उशीरा कळाले. तरीही प्रशासन खूलासा करतांना सांगते की कमिटी नियुक्त केली.आणि त्यांचे शरीरात झींकची जी कमतरता आहे त्यामुळे २००४ पासून एकाही हरणाला तेथे पिल्ले झालेली नाही. याची माहिती प्रशासनाकडे नाही ही बाब प्रशासनाने लपून ठेवली. झींक कमी पडले म्हणजेआपल्या भाषेत त्यांचा आहार कमी पडला म्हणजे कुपोषणाचे बळी ठरले. एक एक कोटी या प्राण्यांच्या अन्ना पदार्थासाठी खर्च करतो असे असतांना प्रांणी कुपोषित होतो तर अधिकारी तर कुपोषित नसेल ना, सदर साहित्य घरात जत असेल म्हणून हे प्राणी कुपोषित झाले. कारण एक स्वतंत्र अधिकारी असून विभागही तेथेच आहे. वन्य विभागातील हरणाचा आहार जस्त असतो हे मान्य आहे परंतू हे हरीण एका ठरावीक जगेत फिरत असते. म्हणून त्यांना लिमीटेड आहार द्यावा लागतो जस्त दिला तरी दुष्परीणाम होतात. परंतू जेवढे अन्न या प्राण्यांना पाहिजे होते तेवढे न मिळाल्याने मृत्यू झाला आहे. सदर ठिकाणी सिंग, कातडी व इतर बॉडी पार्ट सापडले. तातडीने वन विभागाने अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल केला.परंतु मा.आयुक्तांना एक महिण्यानंतर प्राणी मृत्यू झाल्यानंतर कळाले तरीही अधिकाऱ्याची एक वेतनवाढ थांबवीली जते. वेतनवाढ थांबविणे वेगळी बाब होते. चार दिवसात अहवाल यायला पाहिजेहोता. तेथील माती व इतर असणारे प्रदुषण असेल तर यामूळे बॅक्टेरीयल इन्फेक्शन होवू शकते. अस्वच्छतेमुळे होवू शकते. ७ मजूर कोठे काम करतात. तेथे स्वच्छता बघण्याची जबाबदारी मजूरांची नसते, त्यांना का निलंबीत केले. त्यांना सांगितलेले काम करावे लागते. एवढी बुध्दी त्यांना असती तर ते अधिकारी

पदावर असते. यात त्यांचा काही दोष नसतांना निलंबीत केले. नेहमीच प्रशासनाचे असे असते की मोठयाल्यांना सोडणार गरीबांना दंडूका मारणार,कारण गरीब व्यक्ती हा मुक्या प्राण्या सारखा असतो बोलू शकत नाही उत्तर देवू शकत नाही. काय कार्यवाही केली जनतेला दिसावे म्हणून ७ मजूरांना निलंबीत केले. परंतू साप गेल्यानंतर फरपडण्याला रट्टे मारून फायदा नाही. जे मूळ दोषी आहेत त्यांचेवर तात्काळ कार्यवाही होणे आवश्यक होते. वन खात्याची जी झू ऑथर्टी आहे त्याची ताबडतोब कमिटी नियुक्त करावयास पाहिजे होती व चार दिवसात अहवाल मागवायला पाहिजे होता. एक महिण्याची आता मुदत दिली. तोपर्यत उर्वरीत प्राणी मृत्यू झाल्यास काय करणार आहे. विनंती झु ऑथर्टीचे जे डॉक्टर आहे त्यांना आजच्या आज बोलवावे भाडे पगार व इतर खर्च आवशकता पडल्यास प्रशासनाने दयावा. अधिकाऱ्यानी कसे काम केले त्यांना अन्न कमी पडले म्हणून मृत्यू झाला प्रशासनाच्या चूका हया जनतेसमोर येवू दयावे.या प्राण्यांना कमी अन्न दिले गेले त्यामूळे असा प्रकार झाला असा माझा स्पष्ट आरोप आहे. वन्य प्राणी जे की फिरणारे व एका जगेवर बदींस्त असलेले प्रांणी यांना किती अन्न दिले पाहिजे यांचे प्रमाण असते प्रमाणानुसार अन्न न दिल्यामूळे हे प्राणी मृत्यूमूखी पडलेले आहे.चार आठ दिवसाची मूदत देवून दिल्लीचे झू विभागाचे डॉक्टर आणावे.लगेच तेथील माती व इतर परीस्थिती आहे सील करावे. जेणे करून ते अधिकारी आल्यानंतर मातीचे परीक्षण करेल.काय असुविधा होती हे कळेल.व सत्य परीस्थिती समोर येईल.त्यासाठी अधिकारी नियुक्त करावे. स्थानिक नसावे परभणीचे नसावे.दिल्लीचे नियुक्त करावे दोन दिवसात अहवाल येईल व त्यानंतर योग्य ती कार्यवाही करता येईल.

श्री.हिम्मतराव दाभाडे : अनेक वेळा प्राण्याचे मृत्यू झाल्याचे वृत्तपत्राच्या माध्यमातून कळते. आताच खूलासा झाला अमूक डॉक्टर बोलविले. चौकशी समिती नियुक्त केली. अहवाल येईल तेंव्हा येईल आठ कर्मचारी निलंबीत केले त्याबध्दलही दुमत नाही. परंतू असे निदर्शनास येते कीं 'चोर सोडून सन्यासास फाशी' असा प्रकार झालेला आहे.ज्याची चूक झाली ते आजही सेवा करीत आहे. तज्ञा कडून माहिती मिळते की सदर प्राण्यांना पूरेसे अन्न मिळत नव्हते म्हणून मृत्यू झालेला आहे. तेथील जमीन नागरून तेथे चूना टाकलेला आहे. चून्या मूळे अंग होरपळून निघते. जेथे जनावर बसण्याची जगा होती तेथे चूना टाकला जतो. हे कितपत योग्य आहे.व या बाबत अधिकारी यांनी चौकशी का केलेली नाही एक दोन प्राणी मृत्यू झाला असता तर सहन केले असते परंतू तेथे प्राण्याचे कातडीचे ढिगार मिळून आले. असे किती प्रांण्याचे मृत्यू झलेले आहे याची माहिती प्रशासनाला दिलेली होती का ?याचा खूलासा करावा.

मा. आयुक्त : सदर साठा हा १९८८ पासूनचा आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :असे असतांना संबधीत अधिकारी यांचेवर का कार्यवाही केलेली नाही का माहिती दडवून ठेवलेली आहे.या प्राण्याची देखभाल महापालिका करू शकत नसेल व त्यांचे जिवनाशी खेळत असेल तर विनंती की हे सर्व प्रांणी पुणे सारखे ठिकाणच्या उद्यानास शिफ्ट करावे.येथील अधिकारी या कामासाठी सक्षम नाही. जशी आठ कर्मचाऱ्यावर कार्यवाही झाली तशीच कार्यवाही अधिकाऱ्यावर झाली पाहिजे

श्री.अ.साजेद अ.सत्तार : मी पत्र दिले होते. माझ्या प्रश्नाचा खूलासा अद्याप केलेला नाही. सहा महिने झाले.

मा. सभापती : ज्या विषयावर चर्चा चालू आहे तो महत्वाचा विषय आहे. हा विषय संपल्यानंतर आपल्या प्रश्ना खूलासा होईल. या विषयावर मत मांडायचे असेल तर बोलावे.

श्री.संजय शिरसाट : मा.आयुक्तांनी माझ्या चार प्रश्नाचा खूलासा अत्यंत चालाखीने दिलेला आहे. हरीण मृत्यू झाला त्याची माहिती वन विभागाला दिलेली होती या प्रश्ना त्यांनी असे म्हटले की वन विभागाच्या नियमानूसार मृत्यू झालेला प्राणी जळता किंवा पूरता येतो संचालक प्राणी संगृहालय यांचे उपस्थितीत हे होणे गरजेचे आहे. परंतू जळण्यापूवी वन विभागाचे कूणीतरी अधिकारी समक्ष असते त्यांनतरच जळता किंवा पूरता येते. हे सांगायचे विसरले. ज्यावेळी संबधीत विभागास भेट दिली व काहीही न विचारता डायरेक्ट कर्मचाऱ्याना निलंबीत केले.मानुसकी म्हणून साधी त्यांना विचारणा न करता कामावरून कमी केले.

मा. आयुक्त : मला आढळले नाही. मा. महापौरांना आढळले.
(याच वेळी पत्रकार कक्षात मोठमोठयाने बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्री. संजय शिरसाट : प्रेस गॅलरीमध्ये पत्रकारांव्यतिरिक्त इतर कुणासही बसू देवू नये.

मा. सभापती : जेपत्रकार व फोटोग्राफर असतील त्यांनीच पत्रकार कक्षात बसावे, इतरांनी बाहेर जवे.

श्री. संजय शिरसाट : मा.आयुक्तांनी म्हटले वन विभागाचे कर्मचारी आले एवढी कातडी होती एवढी से. मीटर आहे एवढी कुजली असेल.विषयाचे गार्भीर्य कळत नसेल तर विषय बंद करावा. हत्ती , वाघ मृत्यूमूखी पडतो त्यांचे वजन किती होते यांला महत्व नाही. त्यांचे दात व नखे कूठे गेली याला महत्व आहे.आंतरराष्ट्रीय बाजर पेठेस वाघ नखाची किंमत किती आहे कळेल.मा. महापौरांनी भेट दिली आठ कर्मचारी गैरहजर होते महापौरांनी म्हटले म्हणून आयुक्तांनी त्यांना लगेच निलंबीत केले. जर विरोधी पक्ष नेते बोलले अमुक कर्मचाऱ्यास का निलंबीत केले नाही. विचार करून असे म्हणून बघीतले जते. हा सर्व प्रकार होत असतांना अधिकाऱ्यावर केलेली कार्यवाही म्हणे २०० रू. ची वेतनवाढ थांबविली. एखादया व्यक्तीने १०००रू.चोरी केली त्यातील ९०० रू. परत केले १०० रू. साठी कस्टडी घेतली जते. ९०० रू. परत केले म्हणून त्याचेवरील गुन्हा परत घेतला जत नाही.त्या ठिकाणची वाघ नखे. सिंग, तसेच काही प्राण्यांचे तोंड गायब असतांना अधिकाऱ्यावर काहीही कार्यवाही झाली नाही. आवश्यकता वाटली नाही. स्मगलींगचा प्रकार होवू शकत नाही का, स्मगलींग होते, या प्रकारात आयुक्तांनी तातडीने कार्यवाही केली पाहिजे अॅन्टीकरप्शन विभाग कर्मचाऱ्यांवर धाडी टाकतात. ती कार्यवाही पोलीस विभागाची असते. त्यांना रिपोर्ट नूसार का निलंबीत केले जते. जर वन विभाग कार्यवाही करीत असेल तर महापालिकेने काय कार्यवाही केली. यापुढे अॅन्टी करप्शन विभागाने धाड टाकली तर त्या कर्मचाऱ्यानाही यापूढे माफी द्यावी लागेल. बातम्या वेगळ्या येतात. वन विभागाने असे म्हटले की संपूर्ण कार्यवाही केलेली आहे गुन्हा दाखल करणार आहे. एफआयआर सूध्दा दाखल करणार आहे.अटक न करता गुन्हा दाखल करणार आहे. ११ महिण्यात डॉ. रझवी हे सेवानिवृत्त होणार आहे तर जे अधिकारी/संचालक येतील त्यांचेवर हा गुन्हा चालू राहणार काय महापालिका प्रशासन म्हणून संबधीत अधिकाऱ्यावर काय कार्यवाही केली याचा खूलासा होणे आवश्यक आहे.

मा. आयुक्त : जेव्हा सात आठ वाजेच्या सूमारास कळून आले की तेथे साठा दिसून आला लगेच मी तेथे भेट दिली व रेकॉर्डनूसार तेथे साठा आहे किंवा नाही.९९ टक्के तपासणी केली रेकॉर्ड प्रमाणे साठा दिसून आला. संख्येप्रमाणे दिसला ही कार्यवाही केली.

श्री. संजय शिरसाट : आपण तपासणी केली, पडताळणी केली. तेथून वाघ नखे, मुंडके गेलेले आहे. वन विभाग आरोप करीत असेल तर वन विभागावर कार्यवाही करायला भाग पाडू, गेले की नाही.

मा. आयुक्त : नखे किंवा इतर काही भाग गायब झाले की नाही रेकॉर्डनूसार सिध्द झालेले नाही. पूर्ण साठा हा वन विभागाकडे दिलेला आहे. आताच वन विभागाचा अहवाल प्राप्त झालेला आहे. आता मला एक मिनीटापुर्वी फॉरेस्ट विभागाचा अहवाल प्राप्त झाला. हे ट्रॉफी झू मध्ये असल्यामुळे विना परवाना ठेवलेले आहे व ते राज्य शासनाची मिळकत असल्याने त्यांना ताब्यात घ्यायचे आहे. कलम ३९ वन्य प्राणी कायदा १९७२ व त्याप्रमाणे झाले व प्रिलीमिनरी ऑफेन्स डॉ.रझवी, झू डायरेक्टर यांच्याविरूध्द केले आहे. मी स्वत: हून तपासणी करण्याचा प्रयत्न केला जे २००१ मध्ये आयुक्तांची सही आहे. तत्कालीन आयूक्त यांनी तेथील साठा सन विभागास द्यावा म्हणून मान्यता आहे. सकृत दर्शनी रेकॉर्ड वर होते तेवढे उपलब्ध आहे.तरी सुध्दा दुसऱ्या दिवशी वन विभागाने हे तपासणी साठी घ्यावे म्हणून पंचनामा वगैरे करून ताब्यात घेतलेले आहे. रेकॉर्ड नूसार साठयामध्ये तफावत दिसून येत नाही. अहवालात सांगितले २००३ पर्यत पत्रव्यवहार झालेला आहे असे लिहीले आहे. त्यांनी असा ठपका ठेवला की, संचालक प्राणी संग्रहालय यांनी यानंतर हस्तांतरासाठी प्रयत्न केले नाही. दुसरे सांगितले की, प्राणी संगृहालयास दोन बाबी आहेत. एक लोकल फॉरेस्ट अधिकाऱ्यांना देणे, दुसरे जळून टाका. पण सेंट्रल झू ॲथॉरिटीने सांगितले की फॉरेस्टला हस्तांतर करा. दुसरे असे की हा साठा आम्हाला तात्काळ द्यावा नसता तो बंद करून ठेवा. पण सेन्ट्रल झू ॲथॉरीटीने असे म्हटले होते की वन विभागाकडे हस्तांतर करावे. चार वर्ष त्यांनी ॲक्शन घेतली नाही १९८८ पासून हे ट्रॉफी पडलेले होते. महापालिकेने हीच तपासणी केली की जेवढी रेकॉर्डनूसार ट्रॉफी होते तेवढे आहे का त्या दिवशी प्रथमदर्शनी दिसून आलेली होती. आणि वन विभागाच्या रिपोर्ट मध्ये तसे म्हटले नाही की रेकॉर्ड नूसार कमी दिसून आले. सन २००१ ला जेव्हा सेन्ट्रल झू ॲथॉरीटीचे डायरेक्शन आले की हे सर्व ट्रॉफी वन विभागास हॅंडवर्क करावे. दोन वर्ष प्रयत्न करण्यात आले. त्यानंतर चार वर्ष केलेले नसून हे त्यांना माहित होते की, असा इश्यू चालू आहे. जेंव्हा आता २००७ मध्ये साठा आहे असे कळाले तेंव्हा दुसऱ्या दिवशीच वन विभागास सुपुर्त केलेला आहे.

श्री.संजय शिरसाट : पत्रकार येथे बसलेले आहेत. वाघनखे, मुंडके गेलेले नाही? रेकॉर्डनुसार ट्राफी असतील तर तसे जहीर करावे.

मा. आयुक्त : रेकॉर्ड जेवढी संखया होती तेवढी दिसली. वाघ नखे गेली की नाही याबद्दल मला माहिती नाही. तत्कालीन आयुक्तांचा रिपोर्ट आहे, त्यावर सही आहे. संख्या मॅच होते. दोन मोठे हस्ती दंत आहे, दोन लहान आहे. तेथे दोन मोठे व दोन लहान दंत दिसून आले. जितके पांढरे वाघाची कातडी एन नंबर नूसार होती तेवढी दिसून आली. दुसऱ्या दिवशी वन विभागाने ताब्यात घेतली. सन १९८८-८९ पासूनचे ट्रॉफी होते. मध्यतंरी

काही अवयवाचा साठा पंचनामा करून वन विभागालाही पाठविला आहे असे वाटते. तेथील अवयव गायब झालेले असेल किंवा नाही याचा पुरावा आतापर्यंत माझ्या समोर आलेला नाही.

श्री.संजय जेशी : प्रायमरी ऑफेन्स रिपोर्ट बाहेरचे लोक करतात. आपण काय करणार, आपण फक्त वेतनवाढ बंद केली. संबधीत अधिकारी यांना निलंबीत करावे त्यांना त्या विभागातून बाजूला काढावे किंवा सक्तीच्या रजेवर पाठवावे तसेच या विभागातील सर्व परीस्थितीला सील करावे. परिस्थिती बदलली असेल. ज्या वेळेस आठ कर्मचारी निलंबीत केले त्याच वेळी तेथे सील करण्याचा निर्णय आयुक्तांनी घ्यायला पाहिजेहोता.

मा.आयुक्त : मा. महापौर मा. सभापती व उपआयुक्त यांनी स्थळ पाहणी केली व तेथे आठ कर्मचारी विना परवानगीने अनुपस्थित होते त्यांचेवर ॲक्शन घ्यावी असे म्हटले जर ते विना परवानगीने अनुपस्थित असेल हे सिध्द झाले तर ॲक्शन घेण्यात येईल असे मी म्हटले त्यानुसार त्यांचेवर ॲक्शन घेतलेली आहे.

श्री.संजय जेशी : संबधीत कर्मचाऱ्याचे विभाग प्रमूख त्यांचेकडून माहिती घेवून कार्यवाही का केलेली नाही.

मा. आयुक्त : उपआयुक्त (महसूल) यांचेकडून रिपोर्ट आल्यानंतरच अॅक्शन घेतलेली आहे.

श्री. संजय शिरसाट :त्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देवून खूलासा घेवू शकत होते. परंतू तसे केले नाही. मा. महापौर यांनी म्हटले म्हणून त्याचे शब्दा आदर केला मान्य आहे. उदया एखादया झोन मध्ये मा. महापौर भेट देतील तेथे कर्मचारी गैरहजर जे दिसतील त्यांना निलंबीतच करणार काय असा प्रश्न निर्माण होतो. सन २००२-२००३ साली महापालिकेने वन विभागाकडे कातडी व इतर अवयव घेवून जवे म्हणून पत्र व्यवहार केलेला आहे असे म्हटले परंतू गेल्या चार वर्षात महापालिकेच्या पशुधन विभागाने कोणताही पत्र व्यवहार वन विभागाकडे केलेला नाही असे तेथील अधिकाऱ्याचे स्टेटमेंन्ट आहे. हे तातडीचे म्हणून प्रशासनाला पाठविण्याची का आवश्यकता वाटली नाही.

श्री.संजय जेशी : १० मजूर कर्मचारी पैकी ८ गैरहजर होते तरीही तेथील काम चालते. याबध्दल अधिकाऱ्याना काळजी वाटत नव्हती काय.

मा. आयुक्त : आता दोन मिनीटापुर्वीच अहवाल आला. मला गंभीरता कळते. निर्णय घेवू.

श्री.संजय शिरसाट : वृत्तपत्रात असे आले की दिल्लीला जवून मा. आयुक्तांनी वन विभागास मॅनेजकेले.

मा.आयुक्त : आरोप प्रत्यारोप करणे सोपे असते. कुणीही करू शकते. मी दिल्लीला गेलो होतो, मला विज पाहिजे ११ तारखेपासून सुट्टी घेत आहे. १४ तारखेला स्वीडनला जत आहे. जेपर्यंत पर्सनल मुलाखत होत नाही तोपर्यंत विज देत नाही . विजसाठी अर्ज करण्यासाठी गेलेलो होतो. ज्यांना आरोप करायचे त्यांनी करावे. मला अहवाल आला त्यावर विचार करून निर्णय घेणार.

श्री. संजय शिरसाट : जे अहवाल आला त्या संदर्भात काय कार्यवाही करणार आहेत.

मा. आयुक्त : या अहवालावर विचार करून तसेच सीएफ शी बोलून निर्णय घेतला जईल.

श्री.संजय जेशी : १० ऐवजी ८ मजूर गैरहजर होते तेथे सुपरवायझर असेल त्यांनी इतके जस्तीचे कर्मचारी गैरहजर असतांना ती कमी कशी भरून काढली.सूपरवायझर कोण होते. एवढे कर्मचारी गैरहजर असतांना काम चालू होते याचा अर्थ हा जस्तीचा कर्मचारी वर्ग तेथे

आहे.ज्या अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली हे कर्मचारी काम करतात त्यांना अगोदर निलंबीत करावे. शहराच्या नागरीकांच्या वतीने विनंती की हे प्रकरण गंभीर असून संबधीत अधिकारी यांना निलंबीत केले जईल किंवा रजेवर पाठविले जईल किंवा इतर कोणती कार्यवाही होईल. हे जनतेसमोर सांगावे.

श्री.पुरूषोत्तम ठाकूर : जवळपास एक महिण्यापासून या संदर्भात वृत्तपत्रात बातम्या येत आहे. या प्राणी संगृहालयात जे जे प्राणी आहे ज्यांचे पासून महापालिकेस उत्पन्न मिळते पूर्ण शहर त्याचा लाभ घेत आहे. अनेक सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केलेले आहे मा. आयुक्तांनी त्यावर खूलासा केलेला आहे एक किंवा दोन हरीण मृत्यू झाला असता समजू शकलो असतो परंतू १५ हरीण मृत्यू होतात. एक महिणा उलटून जतो तरीही प्रशासनाकडे माहिती दिली जत नाही यांचे दु:ख होते. आपल्या परीवारातील एक व्यक्तीचा मृत्यू झाला तर किती दु: ख होते १५ प्रांणी मृत्यू होतो यांचे दु:ख किती असेल. महापालिका प्रशासनाने तेथील काम करणारे आठ मजूर यांना निलंबीत करून आपले कर्तव्य पूर्ण केले असे दाखविले. कुणाच्या चुकीने मरतात या विषयाला गंभीरतेने घेवून या शहराचे यामूळे नाव बदनाम होवू शकते हा विषय मुंबई दिल्ली मंत्रालय पर्यत जवू शकतो. अनेक प्राण्याचे कातडी साठवलेले दिसून येते. जसे स्मगलींगचा प्रकार होता की काय असे वाटते. दोषीवर कार्यवाही केली पाहिजे जेणे करून जनतेचे समाधान होईल. सन २००७-०८ या वर्षाचे एक वेतनवाढ संबधीत अधिकाऱ्याची थांबविणार असे कळते परंतू संबधीत अधिकारी हे सन २००८ ला सेवानिवृत्त होत आहेत. कोणत्या वर्षाचे थांबविले ?

श्री.अ.रशिद खान मामू : ज्या कर्मचाऱ्यांना निलंबीत केले ते चूकीचे झाले असे वाटते. सर्वसाधारण सभेत मा. महापौर यांनी अनेक कर्मचाऱ्याच्या बाबतीत निलंबीत करण्याचा निर्णय घेतला त्यावेळी चौकशी करून कार्यवाही केली जईल असे नेहमीच प्रशासनातर्फे सांगितले जते.प्रशासनाची चूक झालेली आहे ती मान्य करावी लागेल. मा. महापौर, मा. सभापती यांना गैरहजर दिसून आले ठिक आहे परंतू सदर कर्मचारी यांना का गैरहजर होते म्हणून विचारणा करावयास पाहिजे होती ती विचारणा न करता ॲक्शन घेतलेली आहे.आयुक्त नेहमीच सांगतात की चौकशी केल्यानंतर ॲक्शन घेतली जईल परंतू गरीब कर्मचाऱ्यावर विना चौकशी ॲक्शन घेणे हे योग्य वाटत नाही. विना चौकशी खालच्या कर्मचाऱ्यावर कार्यवाही करणे योग्य वाटत नाही. जनावरांना अन्न कमी दिले जत होते. या बाबत कमेटी नियुक्त करून चौकशी केलेली आहे काय? रिपोर्ट आल्यानंतर ॲक्शन घेणार आहे. सहा महिने रिपोर्ट येण्यास लागतील. तीन किंवा सात दिवसात काही तरी निर्णय घ्यावा. काही प्रमाणात पाण्यामूळे होवू शकते जनरली सर्व जनावर मृत्यू पावत आहे. हत्ती मिळत नव्हते. जेंव्हा एक दोन जनावर मृत्यू पावले त्यावेळी व्हिजेट दिलेली होती का? उद्यान मधून साहित्य गायब होते. ही जबाबदारी कुणाची होती ती पार पाडलेली आहे की नाही. आताच म्हटल्याप्रमाणे अहवाल आल्यानंतर कार्यवाही होईल. परंतू प्रत्येक जनावरांना रोजचे किती अन्न दिले जते किती दयावयास पाहिजे जर वाघामध्ये कमजेर पण कमी झाला तर त्यांचे अन्न वाढविले जते का याकडे लक्ष देण्याची गरज आहे. सभागृहात चर्चा झाल्याप्रमाणे दिल्लीहून डॉक्टर मागवावे, चौकशी करावी. वन विभाग सांगते दोन पत्र मिळाले त्या विभागाने का पत्र

दिलेले नाही. त्या विभागावरही गुन्हा दाखल करावा.कारण त्यांनी त्याची जबाबदारी पार पाडलेली नाही. गोडाऊन मध्ये सूरूवातीपासून जनावराचे कातडी ठेवले जत होते त्यातून किती कमी झाले. जर कमी झाले असेल तर त्यांचेवर कार्यवाही करावी. तेथे जे मजूर काम करीत होते त्यास एका हत्तीने पाय मारल्यामूळे तो मजूर जखमी झाला होता. एका कर्मचारी पायाखाली चेगरला होता.तर एक कर्मचारी यास चेगरून मारले गेले होते. जखमी होवूनही ते लोक तेथे काम करीत आहे. असे असतांना या लोकांना निलंबीत करणे योग्य आहे का?जे पर्यंत चौकशी होत नाही तो पर्यत एकाही कर्मचाऱ्यास निलंबीत करावयास नको होते नसता त्या विभागातील सर्वच कर्मचाऱ्याना निलंबीत करावयास पाहिजे होते. चौकशी करून जेवढे दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.संजय शिरसाट : या प्रकरणात वृत्तांतात एक एक शब्द यावा. या इतिवृत्ताची प्रत घेवून मा.उच्च न्यायालयात दाद मागवायची आहे. आताही मा.आयुक्तांना सांगतो जणून बुजून प्रेशरमध्ये येवून आपण या चौकशीत वाघ नखे गायब आहे. काही प्राण्यांचे मुंडके गायब आहेत. बातम्या आलेल्या आहेत त्याची चौकशी करणार आहे. माझी मागणी आहे हा स्मगलींगचा गुन्हा होवू शकतो. वाघनखे, दात गेले असतील किंवा इतर पार्ट गेले असतील. हा स्मगलींगचा गुन्हा होऊ शकतो. वाघाची कातडी नेवून घरात ठेवेल असा मूर्ख कूणीही नाही. परंतू माझ्या मते मी गंभीरपणे आरोप करतो. या उद्यानात येणारा कस्टमर तेथे जत होता व पाहिजेत्या प्राण्यांच्या वस्तू विकत घेवून जत होता हा माझा स्पष्ट आरोप आहे. पसंत पडले तर तो कस्टमर या चीजवस्तू घेवून जत असेल नसता गोडाऊन मध्ये स्टॉक म्हणून पडलेल्या आहेतच. हा जे प्रकार स्मगलींगचा झालेला आहे. यास प्रशासन पाठीशी घालीत आहे. माझा आरोप आहे हे गंभीर प्रकरण असून संबधीत अधिकारी यांना त्वरीत निलंबीत करून त्यांचेवर क्रिमीनल गुन्हा नोंद करावा. आयुक्त कार्यवाही करणार की नाही त्यांचे स्पष्टीकरण घ्यावे.

श्री.अ.रशिद खान मामू : जेपर्यत पुरावा मिळत नाही तोपर्यत बाहेरील लोक येवून चीजवस्तू खरेदी करून जत होते.असे माहित होते तर त्याच वेळी पोलीसात तक्रार का केलेली नाही. बातमी आली तर का गुन्हा दाखल केला नाही.

श्री.संजय शिरसाट : वन विभागाने गोपनीय रिपोर्ट दिलेले आहे नाव टाकलेले आहे. आरोपी दाखवलेले आहे यापेक्षा काय पुरावा पाहिजे

श्री.अ.रशीद खान मामू : आपण म्हणता तर गुन्हा झाला का?

श्री.संजय जेशी : मा.आयुक्तांना म्हणू द्या. सुटीवर पाठवतो, निलंबन करतो .

श्रीमती जयश्री किवळेकर : १३ हरणांचा मृत्यू झाला अशा बातम्या गेल्या १५ दिवसापासून येत आहे. यावर अनेक स. सदस्यांनी मत व्यक्त केले. आताच मा. आयुक्तांनी खूलासा करतांना म्हटले की मार्च महिण्यात मृत्यू झालेल्या काळवीटची माहिती १५ ते २० दिवस उशीरा मिळाली. दुसरे असे की तेथे बॅक्टेरीयल इन्फेक्शन, झींकची कमी पडल्यामूळे तसेच तेथे अस्वच्छतेमुळे काळवीट व हरीचा मृत्यू झालेला आहे. प्रशासनाने ज्यांचे कडे जबाबदारी दिली ती त्यांनी व्यवस्थित पार न पाडल्याने हरीणाचा मृत्यू झाला असे स्पष्टीकरण दिलेले आहे. प्रशासनास उशीरा माहिती मिळाली व पाहणी केली असता तेथे सात कर्मचारी गैरहजर असल्याचे दिसून आले जेकर्मचारी त्या जनावरांची देखभाल

करीत होते. त्याबध्दल कौतूकही केले असते परंतू चोर सोडून संन्याशास फाशी देणे फार मोठे सार्थक केले असे वाटत नाही. सात मजूर का गैरहजर होते ही जबाबदारी अधिकाऱ्याची होती.त्यांचेवर ॲक्शन घ्यायला पाहिजे होती. प्रशासन दोन वर्षापासून चांगले निर्णय घेत आहे त्याचे कौतूकही वेळोवेळी करण्यात आले परंतू या प्रकरणात कार्यवाहीस उशीर लागतो याची खंत वाटते. मा.आयुक्त काय कार्यवाही करतात याकडे जनतेचे लक्ष होते. जनतेमध्ये आपण आमच्यापेक्षा जस्त फेमस झाले आहात. जे या प्रकरणात जबाबदार आहे त्यांचेवर ताबडतोब ॲक्शन घेण्यात यावी.

डॉ. आशा बिनवडे : एक तासापासून प्राण्यांच्या मृत्यू बाबत चर्चा चालू असून हा विषय गंभीर असून जेवढा गभींरतेने घ्यायला पाहिजे तेवढा प्रशासनाने घेतलेला नाही. दोन बाबी महत्वाच्या वाटत्या की प्राण्याचा झालेला मृत्यू,आणि मृत्यू झाल्यानंतर झालेला निग्लीजन्स व मृत्यू होण्याकरीता जे कारण होते ते झालेले निग्लीजन्स ह्या दोन बाबी वेगवेगळया आहेत. आताच मा.आयुक्तांनी खूलासा केला की मुंबईहून जे डॉक्टर बोलविले त्यांनी असे म्हटले की या प्राण्यांचा मृत्यू सेकंडरी इन्फेक्शन आणि झींकची कमतरतामुळे झाला. ही लज्जस्पद बाब आहे. कोट्यावधी रूपये पालणपोषणासाठी या प्रांण्यावर खर्च करतो. त्यांना ॲनिमिया होतो. त्यांना कुपोषन होते याचा अर्थ अधिकारी किती जबाबदारी पार पाडतात हे लक्षात येते. गेल्या ४ वर्षात लक्षात येत नाही. तेथे दोन हरीण (मादी) होत्या त्यांना पिल्ले होत नव्हती. हे संबधीत अधिकारी यांचे लक्षात येत नाही संबधीत अधिकारी यांना वाईट वाटायला पाहिजेहोते. की ते मुके प्राणी आहे. ते केवळ बोलू शकत नाही. म्हणून त्यांचेकडे लक्ष द्यायचे नाही. मुके प्राणी आहे ते बोलू शकत नाही त्यांना काहीही खायला दिले तरी ते खातील. म्हणून त्यांचेवर अन्याय होवू द्यायचा का. यास जे जबाबदार आहेत त्यांचेवर कार्यवाही होण्यास उशीर होत आहे त्यांचे दु:ख वाटते.आताच स.सदस्य श्री. रशिद खॉन यांनी म्हटले की गरीबांवर ॲक्शन झाली पण मोठ्यावर झाली नाही त्यांचे मताशी मी संपूर्णत: सहमत आहे. जे जबाबदार होते त्यांना बाजूला ठेवून जे काम करणारे कर्मचारी होते त्यांना निलंबीत केले ही बाब योग्य वाटत नाही. सदर कर्मचारी का गैरहजर होते आपण अपेक्षा करीत आहे परंतू ते खरोखर उत्तर देतील हे शक्य नाही. कारण त्यांना स्वत: ची नोकरी बघायची त्यांना त्यांचा संसार बघायचा आहे. त्यांना सत्य माहित असूनही ते कदाचित ते बरोबर सांगणार नाही.म्हणून परीस्थिती जन्य जे पुरावा आहे तो ग्राहय धरला पाहिजे त्या प्रमाणे चौकशी व्हायला पाहिजे. सन २००३ पासून साठवून ठेवले व कोणताही पत्र व्यवहार केला नाही किती निष्काळजीपणा आहे हे दिसून येते. त्याची तस्करी झाली नाही हा प्रश्न वेगळा आहे. अधिकारी पगार घेतात तेवढ्या पुरते काम चांगले करावे.जितक्या तातडीने कार्यवाही व्हायला पाहिजे होती ती झालेली नाही. हे स्पष्ट होते की त्या प्राण्यांना निष्कृषठ अन्न दिले तेथे स्वच्छता पाहिजे ती होत नव्हती. जी देखभाल करावयास पाहिजे ती होत नव्हती हे मुळ कारण आहे. हे सर्व प्रकार कागदोपत्री आणण्यासाठी वेळ लागणार आहे त्याचा अर्थ आहे. जसे पोलीस सांगतात की तपास चालू आहे तसा यात वेळ काढून घ्यायचा असे उत्तर प्रशासनाकडून अपेक्षीत नाही. म्हणून १३ प्राण्याचा मृत्यूशी जे संबधीत अधिकारी जबाबदार होते त्यांचेवर कार्यवाही

फिक्स झाली पाहिजे प्रशासन काय ॲक्शन घेणार आहे याचा खूलासा घ्यावा नसता काय निर्णय घ्यायचा हे सभागृह नक्कीच विचार करेल.

श्री. कचरू मोरे : दीड महिण्याच्या कालावधीत १३ काळवीटाचा मृत्यू झालेला आहे. संचालक प्राणी संग्रहालय यांनी खरोखरच निष्काळजीपणा दाखवलेला आहे. या प्राण्यांचा मृत्यू झाल्यानंतर अनेक पत्रकारांनी संचालक यांची मुलाखत घेतली त्यात त्यांनी म्हटले की लहान लहान प्राणी हे मरतातच हात लावला तरी काळवीट मृत्यूमूखी पडते. किती निग्लेजन्सी आहे. सहज बोलून जण्याचा हा प्रकार आहे. १७ एप्रिलला जेंव्हा काळवीटाचा मृत्यू झाला तेंव्हा संचालक प्रांणी संग्रहालय हे रजेवर होते. त्यांना काळवीट मृत्यूमूखी पडले म्हणून उद्यान अधिक्षक यांनी दुरध्वनीवरून संपर्क केला असता त्यांनी असे म्हटले की उप आयुक्त श्री.कांबळे साहेब यांना कळवा. तसेच वन विभागाला एक पत्र देण्यात यावे. वन विभागाच्या आदेशाची वाट न पाहता लगेच काळवीटाचें दफन करून टाकावे. व या नंतर जे काळवीट मृत्यूमूखी पडतील त्याचे भाष्यही करू नका व कुणालाही कळवू नका असे संचालक यांनी म्हटले आहे. ३० एप्रिलला नवीन उप संचालक रूजू झाले त्यांनी संचालक प्राणी संगृहालय यांची पाठराखण केली काळवीटाचा उपद्रव वाढत चाललेला असून त्यांना मारण्याची परवानगी दिली जणार आहे. असे भाष्य सकाळ पेपरमध्ये आले तसेच काळवीटाचे मृतदेह दफन करणे हे कायदयानूसार गून्हा नाही असे श्री. रझवी यांना सांगितले.जी कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली ती सयुक्तीक वाटत नाही. जे प्राणी आहे ते या शहराचे वैभव आहे हे वैभव लक्षात घेता खालचे कर्मचारी यांना शिक्षा न देता जे संचालक आहे त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करावी.

श्री.मोहन मेघावाले : एक तासापासून या विषयावर स.सदस्स चर्चा करीत आहे. ज्या हरणाचा मृत्यू झाला त्यांना तेथे कर्मचारी उपस्थित नसल्यामूळे वेळेवर अन्न चारा पाणी न मिळाल्याने मृत्यू झालेला आहे. सदर कर्मचारी कुणाच्या सांगण्याने गेलेले होते. त्यांचाही नौकरी व जीवनाचा प्रश्न आहे आताच मा.आयुक्तांनी म्हटले की या बाबतीत चौकशी करू व ते कुणाच्या परवानगीने गेले होते सांगतील अशी अपेक्षा आहे. तेथील जे संबधीत अधिकारी जबाबदार होते त्यांचेवर लगेच निलंबनाची कार्यवाही करावी.

मा. आयुक्त : आता जे अहवाल आला त्यात असा ठपका ठेवला की सन २००३ ते २००७ पर्यत मटेरीयल ठेवण्यात आलेले होते. त्यात त्यांनी दोन पर्याय दिलेले आहे की एक तर ते जळून टाकायला पाहिजे होते किंवा वन विभागाकडे द्यायला पाहिजे होते. सेन्ट्रल झू ॲथॉरीटीने म्हटले होते की वन विभागाकडे हस्तांतर करावे. हस्तांतर करणे हा एकमेव पर्याय होता. जळून टाकण्याचे पर्याय सेन्ट्रल झू ॲथॉरीटीने म्हटले नव्हते. बाकीच्या अवयवाचे काय झाले म्हणून ठपका ठेवलेला नाही. प्री ऑफेन्स नोंदविले आहे, अंतिम रिपोर्ट आल्याच्या नंतरच चार्जसिट दाखल करतील. तस्करी किंवा इतर प्रकार झाल्याचे दिसून येत नाही. एक टक्काही शक्यता दिसली असती तर आपणांस डायरेक्शन देण्याची गरज पडली नसती मी लगेच ॲक्शन घेतली असती. जर तेथील मटेरीयल हे विक्री होत असते तर तेथील साठा कमी व्हायला पाहिजे होता. तो कमी झाल्याचा रिपोर्टमध्ये उल्लेख नाही. प्रिलीमिनरी ऑफेन्स दाखल करत आहेत. यांचे गार्भीय प्रशासनाला पूर्णपणे कळते. ५-१० मिनीटापुर्वीच अहवाल आला. या

रिपोर्टच्या नंतर प्रशासन तातडीने ॲक्शन घेईल. वन विभागाला बोलतो. आजच निर्णय घेतो. परंतू चौकशी होत असतांना जशीच्या तशी परीस्थिती पाहिजे सॉईलची ऑलरेडी ट्रीटमेंन्ट सुरू केलेली आहे. मातीत चुना जणूनबूजून मिक्स केला जतो, बॅक्टेरिया डिस्ट्रॉय करण्यासाठी टाकतो. सॉईलची प्रत वाढली असेलच ऑलरेडी केलेले आहे. कारण विशिष्ट प्रमाणात करावेच लागते. तसेच या प्राण्याना अन्न सूध्दा विशिष्ट प्रमाणात दयावे लागते. जस्त किंवा कमी दिले तरी हाणीकारक असते. अधिकाऱ्यांचा इनंटरफेरन्स किंवा कोणत्याही प्रकारचा फरक हा चौकशी मध्ये पडायला नको हे पण मान्य करतो. आताच रिपोर्ट आलेला आहे आपली भावना या बाबत तिव्र आहे. २४ तासाच्या आत योग्य तो विचार करून निर्णय घेतला जईल असे स्थायी समितीला सांगू इच्छितो.

श्री.संजय जेशी :वन विभागाचा अहवाल येईल तेंव्हा येईल त्यावेळी कार्यवाही होईल परंतू दुर्लक्षित पणामूळे जेप्राणी मृत्यू पडले त्या बाबतीत काय ॲक्शन घेणार आहे.

डॉ. आशा बिनवडे : झींक डिपेन्सीमूळे प्रांणी मृत्यूमूखी पडलेच तसेच ॲनिमियामुळे इन्फेक्शनही झाले याची जबाबदारी ही निग्लेजियन्स म्हणूनच होती हे अगदी सिध्द झालेले आहे. जबाबदार अधिकाऱ्यावर काय ॲक्शन घेणार आहे.

श्री. संजय शिरसाट : वन विभागाचा अहवाल इतका इजे घ्यायला लागलात त्यात ज्या कलमा आहे त्यामूळे सात वर्षाची शिक्षा होवू शकते. वन विभागाच्या अहवालात इंन्टरफेअर करायचे कारणच नाही.

मा. आयुक्त : या प्रकरणामध्ये प्रशासन पूर्णपणे गंभीर आहे.आताच अहवाल आलेला आहे. निर्णय घेण्यासाठी वेळ देणार की नाही.

श्री.संजय जेशी : हरीण मेल्याचा वन विभागाचा रिपोर्ट नाही. त्यांनी कातडी वाचवली आपण दोन मिनिटे गृहीत धरू. त्याबद्दल काही म्हणणे नाही. शासन करेल काय करायचे. नावाला तुमच्याकडे आला. हरीणाचा मृत्यू होतो त्या बाबतीत काय ॲक्शन घेणार आहे. दोन विषय वेगवेगळे आहे. एकत्र करू नये.नसता प्रशासनाने मेले मेले हरीण मरू द्या आम्ही चौकशी करू. शहराला कळू द्या, आमचे नाव खराब होता कामा नये.

श्री.हिम्मतराव दाभाडे : जर निलंबन करायचे नसेल तर हरीण का मेले म्हणून पोलीस केस करा.

श्रीमती जयश्री किवळेकर : जे १३ हरीण मृत्यूमूखी पडले ज्या अधिकाऱ्यावर जबाबदारी दिली होती त्यांनी दुर्लक्षितपणा केलेला आहे त्यांचेवर या बाबत कार्यवाही करणे व जे अवैध कातडी साठवणे हा विषय वेगळा आहे. मा.आयुक्त काय ॲक्शन घेतात याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे. आमच्यापेक्षा आपण जस्त प्रसिध्द आहात, लोकप्रिय आहात. ज्या ८ कर्मचाऱ्यावर कार्यवाही केली त्यांचेवर अन्याय केला परंतू प्रशासनातील जे जबाबदारी अधिकारी होते त्यांचेवर ॲक्शन घ्यायला पाहिजे

मा. आयुक्त : झींक कमतरता दोन कारणांमूळे होवू शकते. एक तर जितक्या प्रमाणात अन्न दयायला पाहिजे ते मिळाले नसेल किंवा ज्या प्रकारचे जेवण प्रमाणाकानूसार दयावयास पाहिजे ते मिळाले नसेल. या मागचे कारण काय व पून्हा होवू नये म्हणून कमेटी नियुक्त केलेली आहे. चपळगांवकर साहेबांनी मान्य केले आहे. कमेटीचा अहवाल एक महिण्यात येईल. तेवढा वेळा द्यावाच लागेल. जेपर्यत रिपोर्ट येत नाही तोपर्यत ॲक्शन घेणे योग्य वाटत नाही. झींक कमतरता कशामूळे होते या बाबतीत प्रशासन माहिती

घेईल. जेनॉनवेजअसतात त्यांना वगळून बाकी सर्वांना झालेली आहे. तेथील सर्व साठा वन विभागाकडे दिलेला आहे. येत्या २४ तासात कार्यवाही होईल परंतू चौकशीत इंनटरफेअर व्हायला नको व चौकशीमध्ये तथ्य बाहेर यायला पाहिजे. त्यांना एक महिन्याचा कालावधी द्यायला पाहिजे. पुढील २४ तासाच्या आत यावर प्रशासन निर्णय घेईल. जेआठ कर्मचारी आहे ते विना परवानगी गैरहजर होते. माझ्याकडे रिपोर्ट आलेला आहे. त्यांना त्याचे म्हणणे मांडण्यासाठी आठ दिवसाचा वेळ दिलेलाआहे. त्याचा खुलासा येईलच ते का गैरहजर होते.

डॉ. आशा बिनवडे :गैरहजर होते म्हणजे तेथे कामावर हजर नव्हते. प्रत्यक्षात ते कूठे होते. एकच कर्मचारी गैरहजर नव्हते तर एकदम आठ कर्मचारी गैरहजर होते यांचे वेगळे कारण असू शकते.

श्री.संजय जेशी : आठ कर्मचारी एकाच वेळी गैरहजर होते .हे प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतरही संबधीत अधिकारी यांचेवर कार्यवाही का होत नाही.चौकशीत इंटरफेअर नको, चौकशीत कोण इंटरफेअर करणार आहे. जर अधिकारी इंन्टरफेर करीत असेल तर त्यांना एक तर सक्तीच्या रजेवर पाठवायचे किंवा निलंबीत करावयाचे असते.

श्री.संजय शिरसाट :जर कर्मचारी यांनी म्हटले अधिकाऱ्यांच्या शेतावर काम करीत होतो. तर काय कार्यवाही करणार आहे.

मा. आयुक्त : सदर कर्मचारी यांचा तसा खुलासा आला पाहिजे. तर कार्यवाही करता येईल.

श्री. संजय जेशी : १० मिनिटापूर्वी एक काळवीट मृत्यूमूखी पडलेले आहे.अधिकाऱ्यांना विचारणा करावी. गंभीर बाब असून सुध्दा प्रशासन म्हणते बघू आणि करू हे योग्य नाही.

मा. आयुक्त : माहिती घेतली असता ज्यांचेवर उपचार चालू होते त्यातील एक काळवीटाचा नुकताच मृत्यू झालेला आहे.

श्री.संजय जेशी : काळवीट मरतात मरू द्यावे. आम्ही काही कार्यवाही करीत नाही असे तरी प्रशासनाने जनतेसमोर जहीर करावे.

मा. आयुक्त :असे प्रशासन म्हणू शकत नाही. काय कार्यवाही करणार आताच खूलासा करावा करावा असे म्हणणे योग्य वाटत नाही. त्यात चूक होवू शकते.

श्री.अ.रशिद खान मामू : दबाव टाकून कार्यवाही करणेस भाग पाडू नका. चौकशी करावी.

श्री.संजय जेशी : एक महिण्यापासून काळवीटांचा मृत्यू होतो . त्या आजराची ट्रीटमेंन्ट सुध्दा घेतली जत नाही. त्याची जगा बदलली नाही.

मा. आयुक्त : जेडीन आहेत त्यांनी सल्ला दिल्यानुसार औषधोपचार चालू आहे.

श्री.अ.रशीद खॉन :आजराने मृत्यू होत आहे की होवून कूणी मारतात. इनकाऊटर तर कूणी करीत नाही ना?

श्री.संजय शिरसाट : इनकाऊन्ट जरी कुणी करीत असेल तर संचालकावर ती जबाबदारी आहे त्यांनी लक्ष ठेवणे आवश्यक आहे.चूकीचे उत्तर देण्यात येत आहे. वन विभागाला सूध्दा दोन किंवा तीन वाघाचा मृत्यू झाला असेल त्यांची कातडी आहे नखे आहे असे कूठेही दिलेले नाही.वाघाची कातडी स्टॉकला होती तर नखे किती होती त्यांची नोंद घ्यायला सांगितले नाही. ज्यांनी ही बनवाबनवी केली कातडी होती तर नखाची कुठे नोंद घेतलेली आहे.

मा.आयुक्त : वन विभाग चौकशी करणारच आहे. चौकशीमध्ये सर्व समोर येईल.

श्री. संजय शिरसाट : एक दिवसाचा विषय नसून गेल्या १५ दिवसापासून हा विषय गाजतो आहे १० मिनिटापूर्वी एक काळवीट मृत्यू पडले एखादयाला निलंबीत करण्याचा विषय नाही. मोठमोठया बातम्या, एक एक पान बातम्या येत आहे. तरी प्रशासनास काहीच वाटत नाही. का कार्यवाही करीत नाही. जे काम करणारे कर्मचारी आहे त्यांना प्रशासन निलंबीत करते . त्यांना निलबीत का करू शकत नाही. एक नगरसेवक सभागृहात रॉकेलची बॉटल घेवून आले होते त्यांचे बाजूला सुरक्षा रक्षक उभे होते. तरी त्यांना कारणे दाखवा नोटीस दिली जते. यांना निलंबीत करण्यात प्रशासनामध्ये ताकद नाही सर्व जतीवादावर आधारीत काम करीत आहे. हा माझा आरोप आहे.

मा. आयुक्त : जतीवादाचा आरोप पूर्णपणे चुकीचा आहे. अधिकारी हे अधिकारी असतात कुण्या जतीचे नसतात.

श्री.अ.रशिद खान मामू : जतीवादाचा मुद्दा पुढे करून दबाव टाकला जत आहे.

श्री.संजय शिरसाट : १५ दिवसापासून बातम्या येतात साधी कारणे दाखवा नोटीस दिली नाही.

मा. आयुक्त : प्रोसीजर बद्दल पूर्ण चौकशी करून घेतलेली आहे. त्यांचेवर ॲक्शन घेतलेली आहे.

श्री.संजय शिरसाट : काहीच कार्यवाही करायची नसेल तर योग्य नाही. सभागृहात स. सदस्यांचे आपआपसात भांडण लावण्याचा हा प्रकार आहे. दबाव टाकला जतो असे म्हणणे चुकीचे आहे.

श्री.अ.रशिद खान मामू : सभागृहात मोठमोठ्याने अनेक सदस्य बोलतात. ओरडून सांगितल्याने काम होते असे नाही. स.सदस्यांची जी सूचना असेल ती शांततेने मांडावी.

श्री.संजय शिरसाट : स.सदस्य श्री.रशीद मामू यांची सूचना आहे शांततेने बोलावे. १५ दिवसापासून बातम्या येतात. झालेले घटनेबाबत संबधीत अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस, निलंबनाची कार्यवाही किंवा दीर्घ मुदतीच्या रजेवर पाठवणे यापैकी कोणती कार्यवाही करणार आहात. प्रशासनाने काहीतरी कार्यवाही करावी जणे करून अधिकाऱ्याना कळेल की चांगले काम केले पाहिजेजेकाळवीट मृत्यू मूखी पडले ते फक्त बोलू शकत नव्हते. माणसाप्रमाणेच त्यांचा जेव आहे, त्यांना सभागृहातर्फे श्रध्दांजली अर्पण करावी.

श्री.संजय जेशी : एक काळवीट आताच मृत्यू झाला यांची माहिती आयुक्तांना किंवा त्या विभागाचे प्रमुख यांना माहित नाही ती माहिती नगरसेवकापर्यत येते.

श्री.अ.रशिद खान मामू : आताच स. सदस्य श्री. शिरसाट मांडलेली आहे. त्यांची भावना प्रशासनाने समजून घ्यावी व जी काय कार्यवाही करता येईल ती करण्यात यावी.

मा. आयुक्त : हे प्रकरण सात दिवसापूर्वी प्रशासनापूढे आले होते. पहिले प्राधान्य यास दिले की या प्राण्याना कोणत्या रोगाची लागन झालेली आहे त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करायचा.म्हणून डीन यांना बोलवून घेतले त्यांचा रिपोर्ट रात्री ११.३० वाजता आला. ज्यांचेवर उपचार चालू होते त्या पैकी एका हरणाचा आताच मृत्यू झालेला आहे.आणखी ज्यांचेवर उपचार चालू आहे त्यास वाचविणे प्रथम कर्तव्य आहे. ज्या कर्मचाऱ्याच्या निष्काळजीपणामूळे हा प्रकार घडला ते कारणीभूत ठरले तर त्यांचे वर तात्काळ ॲक्शन घेतली जईल.या क्षणी प्रशासनाने निर्णय घ्यावा असा हट्ट धरू नये.लवकरात लवकर कार्यवाही होईल यात शंका नाही.मागिल सात दिवसात सदर कर्मचाऱ्याना बोलवून त्याच बाबतीत चौकशी करीत होतो.

श्री.संजय जेशी : अधिकाऱ्यांनी वाघाची कातडी वाचविली तर प्रशासन अधिकाऱ्याची कातडी वाचवतील असे दिसते.

मा. आयुक्त :या प्रकरणातून कूणीही सूटणार नाही जे दोषी आहे त्यांचेवर कार्यवाही होईल.आताच कार्यवाही केली तर पून्हा पून्हा चूक होवू शकते.

श्री.हिम्मतराव दाभाडे :आताच एक काळवीटाचा मृत्यू झाला. जर त्यांचे आजराचे निदान झाले नसेल तर पोलीसात तक्रार करावी. पंचनामा करावा. पीएमला पाठवावे. कोणता आजर होता हे कळेल.संबधीत अधिकाऱ्यावर पोलीसात तक्रार करावी.

मा. आयुक्त : आतापर्यत ज्या प्राण्यांचा मृत्यू झाला त्यांचे पी. एम.करण्यात आलेले आहे. जेपर्यत डीन आले नव्हते. तो पर्यत मुलभूत कारण झिंक कमतरता आहे असे माहित नव्हते. बॅक्टेरीयल इन्फेक्शन वाटत होते. बॅक्टेरीयल इन्फेक्शन होते परंतू ते सेकंडरी रिजन होते.

डॉ. आशा बिनवडे : आणखी किती प्राणी आजरी आहेत.

संचालक प्रा.सं. :२६ एप्रिलला जे परभणीहून पथक आले होते. मराठवाठा विभागाचे परभणीमध्ये पशुवैद्यकीय कॉलेज असल्याने तेथे पहिले अप्रोच होतो. सध्या चार प्राणी असून दोन प्राणी दिं. २७ ला ॲडमीट केले होते. दहा दिवसापासून ट्रीटमेंन्ट चालू होती. आज सकाळी आताच विषय निघाला त्या प्रमाणे दोन हरीणांचा मृत्यू झालेला आहे. आणखी पाच हरीण ठेवले होते. चार हरीण चांगले झाले. लहान पिंजऱ्यात टेंशनमध्ये असून पिल्ले टकरा मारतात. म्हणून त्यांना बाहेर सोडले. फ्लॉक ट्रीटमेंन्ट चालू आहे. जे चार चांगले झाल्याचे दिसून आल्यानंतर सोडलेले आहे. दोन होते त्यांचा मृत्यू झाला. इनपेशंड मध्ये सध्या एकही नाही. ट्रीटमेंन्ट झाल्याने लहान पिंजऱ्यात टकरा होत होत्या फ्लॉकमध्ये त्यांना अजून चांगला रिसपॉन्स मिळेल. अडंर केअर एकच प्राणी ठेवलेला आहे. फ्लॉकजवळ पिंजरा आहे तेथे ठेवले आहे.

डॉ. आशा बिनवडे : ॲनिमिया झाल्यामूळे त्यांची प्रतिकार शक्ती इतकी कमी झाली की आता त्यांना स्पेशल केअर दिली तरी ते जिवंत राहणार नाही. या प्रांण्याकडे अगोदरपासून लक्ष दिले असते तर कदाचित उपचारासाठी मुंबईला शिफ्ट करू शकलो असतो.

संचालक प्रा.सं. : ॲनेमिया असे नाही कारण ब्लड रिपोर्ट घेतो. ब्लडफिगर नॉर्मल आहेत.

डॉ. आशा बिनवडे : झींक डिफेसियेन्सी होणे म्हणजे प्रतिकार शक्ती कमी होणे होय हे तर मान्य आहे . आता काही जरी उपाय केला तरी ते वाचवू शकत नाही. चांगल्या ठिकाणी मुंबईला शिफ्ट केले असते तर ते नक्कीच जिवंत राहिले असते.

संचालक प्रा. सं. : हरीणाला शिफ्ट केले तर मॉटेलिटी होते.

डॉ. आशा बिनवडे : त्यांना मेडीकल केअर करण्यासाठी शिफ्ट करावयास पाहिजेहोते.

मा. आयुक्त : संबधीत अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की त्यांना पकडणे अवघड असून शिप्ट केल्यास ते अत्यंत घाबरून जतात.

संचालक प्रा.सं. : २८, ३० एप्रिल रोजी ज्या दोन हरणांचा मृत्यू झाला तो टकरीमूळे झालेला आहे. स्प्रोडीकेस डोक्याच्या इजेमुळे सेन्सेटीव्ह झाले होते. १७ तारखेस एक आढळले, २४ मार्चला मृत्यू झाला. शासकीय पशुचिकित्सालय यांचेकडे संपर्क साधला. तेथील ४ डॉक्टरांच्या सुचनेप्रमाणे २३ ते ३१ मार्च पर्यत पूर्ण वेळ ट्रीटमेंन्ट केले. १७ दिवस कोणते मॉटीलीटी नव्हते. १० एप्रील रोजी मी आजरी असल्यामूळे मा. आयुक्तांची

परवानगी घेवून सुटीवर होतो. ट्रीटमेन्ट चालू होती. या विभागात जे सुपरवायझर आहे ते दिं. २५ तारखेला रात्री माझ्याकडे आले व सहा प्राण्याचा आतापर्यंत मृत्यू झालेला आहे यापूर्वीच मला कळवायला पाहिजे होते असे मी म्हटले. उपआयुक्त यांची परवानगी घेवून परभणीचे डॉक्टरांना हेड ऑफ मेडीसीन बोलवण्यात आले. ते दिनांक २७ एप्रिल रोजी हजर झाले डॉक्टर आले. त्यांचे टीटमेंन्टच्या नंतर सूध्दा काही प्राणी दगावली आहे. महानगरपालिकेकडून कोणत्याही प्रकारची हलगर्जीपणा झालेला नाही. असे माझे म्हणणे आहे. आपणाकडे ट्रीटमेंट रजिस्टर आहे.

मा. आयुक्त : दोन वर्षापासून ही बाब का लक्षात आली नाही असा प्रश्न आहे.

संचालक प्रा.सं. : सामान्यत: २५ पेक्षा जस्त प्राणी ठेवायला नकोत नॉर्मस् आहेत, ५० म्हणजे दुप्पट होते. या संदर्भात वन विभागाला व इतर प्रांणी संग्रहालयास कळविले की, जस्तीचे असलेले प्राणी पाहिजेत का?

मा. आयुक्त : कशामुळे होत आहे, कोणतीही गोष्ट कन्ट्रोलमध्ये राहायला पाहिजे याचे कारण शोधायला पाहिजे

संचालक प्रा.सं. : पॉलीक्लिनीकची टीम नेहमी व्हीजेट करते. दर आठवड्यास सहाय्यक संचालक हे देखील येऊन जतात. हे सर्व एकदम झालेले नाही. डीन साहेबांनी सांगीतले झिंकची कमतरता एकदम दिसून येत नाही. प्राण्यांना गोदरेज कंपनीचे योग्य गुणवत्तेचे खाद्य देण्यात येते. त्यात मिनरल राहतात.

श्री.संजय जेशी : हरणांना किती अन्न दिले. किती द्यायला पाहिजे या बाबतीत एक रजिस्टर आहे. ते आताच ताब्यात घ्यावे. नेमकी परीस्थिती काय आहे हे कळेल मा. सभापतींनी यावर निर्णय द्यावा.

मा. आयुक्त : आपले कर्मचारी पाठवून मागवून घेणयात यावे.

श्री.मधुकर सांवत : दोन तासापासून यावर चर्चा चालू आहे. मा. आयुक्तांवर निर्णय सोपवावा आणि आयुक्तांनी खुलासा करावा की किती तासामध्ये निर्णय घेणार आहे.

मा. सभापती : सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता मा. आयुक्तांनी २४ तासाच्या आत म्हणजेच उद्या ११ वाजेपर्यंत या हरणांच्या मृत्यूबद्दल काय कार्यवाही केली याचा सविस्तर अहवाल उद्या ११ वाजेपर्यंत देण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :२५ नोव्हेंबर पासून मी अतिक्रमणाच्या बाबतीत व दुसरा एक प्रश्न आहे त्या बाबतीत मा. आयुक्तांना पत्र व्यवहार करीत आहे. मा.आयुक्त संबधीत अधिकाऱ्याना का पाठींशी घालत आहे खूलासा घेण्यात यावा.एवढी चर्चा झाली. खालच्या कर्मचाऱ्यावर तात्काळ कार्यवाही केली.मी दिलेल्या पत्रानूसार या प्रकरणा बाबतीत मी उच्च न्यायालयात दाद मागणार आहे.किती दिवस प्रशासन पाठींशी घालणार आहे.

मा. सभापती : मा. आयुक्त यांनी खूलासा करावा.

मा.आयुक्त : चेलीपूरा भागातील एका अतिक्रमणाच्या संदर्भात......

श्री.अ.साजेद अ. सत्तार : चेलीपूरा येथील प्रश्न नाही. ८० हजर घरांचा प्रश्न आहे. सर्व शहरात मोठया प्रमाणात अतिक्रमण झालेले आहे. लेखी दिलेले आहे. तीन तारखेपर्यत प्रशासनाने काय उत्तर दिलेले आहे. २६ नोंव्हेबरला मी पत्र दिलेले आहे मा. आयुक्त हे अधिकाऱ्याना पाठीशीं घालीत आहे.

(याच वेळी स. सदस्य श्री. अ. साजेद अ. सत्तार हे तावातावाने मा. सभापती यांचे डायस समोर माईक घेवून जातात. जाताना माईक स. सदस्य श्री. पुनमचंद बम्हणे यांना लागतो. त्यांची स.सदस्य श्री.अ.साजेद यांची आपसात बोलण्यावरून थोड्या वेळेपुरता वाद होतो.)

मा. सभापती :स.सदस्य श्री. अ. साजेद अ. सत्तार यांना विनंती की, त्यांनी त्यांचे म्हणणे आपल्या जगेवरून मांडावे. मा.आयुक्तांकडून खुलासा घेतला जईल.

श्री.मधुकर सांवत : माईक फेकण्याची गरज नव्हती. सभागृहात असे करणे योग्य नाही. त्यांनी त्यांचे म्हणणे मांडावे.(काही स.सदस्य मोठमोठ्याने बोलतात.)

डॉ. आशा बिनवडे : जबाबदार सदस्यांनी अशा प्रकारचे वर्तन करणे बरोबर नाही. आम्ही सदस्या या सभागृहात अशा परीस्थितीत बसू शकत नाही. जे काही बोलायचे आहे हे व्यासपीठ बोलण्यासाठी आहे. माईक फेकण्यासाठी किंवा कूणाच्या अंगावर रागाने जण्यासाठी मूळीच नाही. एखादया सदस्यांना माईक लागला असता तर विचित्र पध्दतीने या सभागृहात वाद विवाद सुरू झाले असते. स. सदस्य हे सर्वोच्च सभागृहामधील विरोधी पक्ष नेते असून त्यांनी असे वर्तन करणे योग्य नाही. जे काही मत मांडायचे आहे ते मांडाचे तो अधिकार आपल्याला आहे. माईक बोलण्यासाठी आहे, शांततेने बोलावे.

श्री.संजय शिरसाट :आजची ही पहिली स्थायी समितीची बैठक होत आहे. सर्वसाधारण सभा ही सर्वोच्च सभा असते स्थायी समिती ही कॅबीनेट सभा असते येथे फायन्सीयल अधिकार असतात. विरोधी पक्ष नेता यांनी सर्वसाधारण सभेत मागणी केली होती. मा. महापौर यांनी रूलीग दिली.आयुक्तंनी कार्यवाही केली नाही असे विरोधी पक्ष नेते यांचे म्हणणे आहे.१ तारखेला कामगार दिनाच्या दिवशी विरोधी पक्ष नेते हे उपोषणास बसणार असे माझ्या वाचण्यात आले.

मा. सभापती : सूरक्षा रक्षकांना सूचना की, प्रेस गॅलरीमध्ये पत्रकारांशिवाय कुणीही असू नये.

श्री.संजय शिरसाट : १ तारखेला उपोषणास बसणार होते. आत्मदहन करणार होते. मा. महापौर व इतर पदाधिकारी यांची चर्चा झाली. चर्चा झाल्यानंतर त्यावर निर्णय होणार असे कळाले. निर्णय का होत नाही का घेतला जत नाही. दोन तासापासून चर्चा चालू आहे काय निर्णय घेणार आहे ते उदया ११ वाजेपर्यत कळणार आहे. विरोधी पक्ष नेते यांनी म्हटले की कार्यवाही होत नाही म्हणून अधिकाऱ्यावर संताप व्यक्त करण्याचा प्रयत्न केला संताप करण्याची पध्दत वेगळी असली तरी संताप व्यक्त केला हे निश्चित आहे. सभागृहातील जे सदस्य आहे हे त्यास कारणीभूत नाही. स. विरोधी पक्ष नेते यांचा राग आयुक्तांवर आहे. माईक मारायचे असेल तर मा.आयुक्तांकडे मारावे. परंतू ही पध्दत सुध्दा चुकीची आहे.

(याच वेळी मा.आयुक्त व इतर अधिकारी सभागृहाच्या बाहेर जाण्यासाठी निघतात. त्यावेळी स.सदस्य व मा.आयुक्त यांचे मोठमोठयाने बोलणे चालू असते काहीही ऐकू येत नाही.)

श्री.संजय शिरसाट :या सभागृहात कामकाज करीत असतांना कोणते विषय घ्यायचे यांची कल्पना मा.आयुक्तांना यापुढे देण्यात यावी.

श्री.संजय जेशी : यापुढे ज्या विषयावर चर्चा होणार आहे याची कल्पना मा.आयुक्त तसेच मा.सभापती यांना सुध्दा देण्यात यावी. जे चर्चेचे विषय आहे ते सर्वांनी एकत्रित येवून माहिती देवून चर्चा करू माईक फेकण्या इतपत येणार नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : आतापर्यत तीन सदस्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. स.सदस्यांच्या प्रश्नाकडे प्रशासन लक्ष देत नाही.

श्री.संजय शिरसाट : स. विरोधी पक्ष नेता यांचे प्रश्नाशी आम्ही सहमत आहोत. भावना समजून घेतलेली आहे. मा. आयुक्तांनी इशारा केल्यानंतर अधिकारी सभागृह सोडून जत आहे हे योग्य नाही. त्यांनी सभापतीची परवानगी घ्यायला पाहिजे

श्री.मो.जवेद मो.इसाक : आयुक्त व सर्व अधिकारी यांना विना परवानगी बाहेर जत आहेत सर्वांना निलंबीत करावे.

(याच वेळी सभागृहात मा.आयुक्त तसेच स.सदस्य यांच्यात मोठमोठयाने बोलणे चालू असते, काहीही ऐकू येत नाही.)

मा. सभापती : अर्ध्या तासासाठी तभा तहकूब करण्यात येते.

(वेळ दु. २.१५ वा. पुन्हा सभा ४.१५ वा. सुरू)

**विषय क्र.02 :**

दिनांक **11/4/2007**(का.प.क्र.01) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

मा. सभापती : सभापती निवडीच्या बैठकीचे इतिवृत्त आहे. मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक **11/4/2007** रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र.03 :**

शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, सन 2007-2008 या वर्षासाठी चिकलठाणा आठवडी बाजार फी वसुली ठेका देण्यासाठी दोन वेळेस जाहीर निविदा सूचना काढली असता एक वेळेस प्रति बाजार रू.9600/- व दुसऱ्या वेळेस एकही बोलीधारक/निविदाधारक न आल्याने तिसऱ्या वेळेस मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांचे मान्यतेनुसार जा.क्र.मनपा/मामअ/489/2007, दि.26/3/2007 रोजी जाहीर सूचना देऊन कोटेशन मागविण्यासाठी नोटीस बोर्डावर डकविण्यात आली असता दिनांक 29/3/2007 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत तीन कोटेशन प्राप्त झाले, ते खालील प्रमाणे.

1) श्री.उमेश शिवलाल परदेशी रू.9100/-
2) श्री.मिर्झा सलीम बेग रू.9000/-
3) श्री.मीर साजीद अली मीर हमीद अली रू.8700/-

महानगरपालिकेने सदरील बाजारासाठी आधारभुत किंमत प्रती बाजार रू.11,000/- ग्राह्य धरली होती. परंतु दोन वेळेस जाहीर निविदा सूचनेस बोलीधारकांनी प्रतिसाद न दिल्याने तिसऱ्या वेळेस कोटेशन मागवून त्यात श्री.उमेश शिवलाल परदेशी यांनी रक्कम रू.9100/- प्रति बाजार जास्जीचा दर दिलेला आहे. गतवर्षी या बाजाराचा ठेका रू.8600/- प्रति बाजार मा.स्थायी समितीची मान्यता घेऊन देण्यात आला होता.

गतवर्षी पेक्षा श्री.उमेश शिवलाल परदेशी यांची बोली जास्त असल्याने प्रशासकीय मान्यता मिळाल्यानुसार संबंधीताकडून आगाऊ तीन महिन्याचे 25% रक्कम रू.1,18,300/- व 25% राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी रू.1,18,300/- घेऊन श्री.उमेश शिवलाल परदेशी यांना रक्कम रू.9,100/- प्रती बाजार दिनांक 13/4/2007 ते 31/3/2008 पर्यंत फी वसुली करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन 2007-2008 या वर्षासाठी चिकलठाणा आठवडी बाजार फी वसुलीसाठी श्री.उमेश शिवलाल परदेशी यांची बोली जास्त असल्याने संबंधीताकडून आगाऊ तीन महिन्याचे 25% रक्कम रू.1,18,300/- व 25% राष्ट्रीयीकृत बँकेची बँक गॅरंटी रू.1,18,300/- घेऊन श्री.उमेश शिवलाल परदेशी यांना रक्कम रू.9,100/- प्रती बाजार दिनांक 13/4/2007 ते 31/3/2008 पर्यंत फी वसुली करण्यासाठी ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.04 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गादीया विहार, शहानुरवाडी हा भाग स्वयं विकास (Self Development) योजने अंतर्गत विकसीत झाला असून येथील बिल्डर यांनी डांबरीकरणाचे काम केलेले नाही. करीत संबंधीत बिल्डर यांचेवर कार्यवाही करून त्यांना काळ्या यादीत समाविष्ट करणे व डांबरीकरणासाठी लागणारा खर्च रू.3,85,000/- तेथील फ्लॅटधारकांकडून वसुल करून डांबरीकरण करण्याचे मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.संजय जेशी : हा प्रस्ताव स्थगित करावा.

श्री.मधुकर सांवत : सेल्फ डेव्हलपमेंन्टचा विषय आहे. व दुसऱ्या ओळीत असे म्हटले की संबधीत बिल्डर यांना काळया यांदीत टाकण्यात येईल म्हणजे काय कार्यवाही होणार आहे. शहानूरवाडी भागातील हा प्रस्ताव सेल्प डेंव्हलपमेंन्टसाठी खर्च करणार होते परंतू असे काहीही केलेले नाही. नागरीकाकडून जमा करून रस्ता तयार करणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार : बिल्डरांना काळया यादीत टाकता येते का याचा खुलासा करावा.

मा.सभापती : हा प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**<u>विषय क्र.05 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.36 अंतर्गत नागेश्वरवाडी व भोईवाडा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,96,710/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम तीन वर्षापुर्वी झालेले असून प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 800 मी. व रूंदी सरासरी 7.00 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 4 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. ए. एस. कन्स्ट्रक्शन 20% जास्त दराने

वरील प्रमाणे मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची निविदा अं.प.दरापेक्षा 20% जास्त दराची आहे. डांबराचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 12.77% जास्त दर येत आहेत. यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.9,96,710/- पेक्षा जास्त म्हणजेच रू.11,23,990/- एवढा खर्च होणर आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए.एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.77% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.36 अंतर्गत नागेश्वरवाडी व भोईवाडा भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार सदरील काम ए. एस. कन्स्ट्रक्शन यांच्याकून अं.प.दरापेक्षा 12.77% जास्तदराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.06 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.62 भाग्यनगर येथील विवेकानंद चौक ते भाग्यनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.9,97,000/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील भागातील रस्त्यांचे काम तीन वर्षापुर्वी झालेले आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्याची लांबी 450 मी. व रूंदी सरासरी 12.00 मीटर आहे. सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता 7 निविदापत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एक निविदा प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

1. ए. सी. कोठारी — 7.99% जास्त दराने

वरील प्रमाणे मे.ए.सी.कोठारी यांची निविदा अं.प.दरापेक्षा 7.99% जास्त दराची आहे. डांबराचे बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 7.99% जास्त दर येत आहेत. यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.9,97,000/- पेक्षा जास्त म्हणजेच रू.10,76,660/- एवढा खर्च होणर आहे. यास मा.आयुक्तांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीपुढे सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए.सी. कोठारी यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 7.99% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.62 भाग्यनगर येथील विवेकानंद चौक ते भाग्यनगर मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 7.99% जास्त दराची ए.सी. कोठारी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्र.07 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात इटालियन डिझायनर पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामाचे अंदाजपत्रक रू.8,59,600/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम गुत्तेदार अरबाज कन्स्ट्रक्शन यांच्याकडून 2% जास्त दराने करून घेण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामात जन्ममृत्यू कार्यालय, सुरक्षा अधिकारी यांचे दालन व मा.महापौर यांचे वाहनतळाचा यात समावेश नव्हता. सदर ठिकाणी सुध्दा पेव्हींग ब्लॉक बसवून परिसराचे सौंदर्यीकरण करणे आवश्यक असल्याने मुळ अंदाजपत्रकीय रक्कम रू.8,59,600/- पेक्षा अंदाजपत्रकातील तरतुदी व परिमाणमध्ये वाढ होत असल्याने सुधारीत अंदाजपत्रक रू.10,70,626/- चे होत आहे. सदर कामास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.10,70,626/- व वाढीव काम, मुळ कंत्राटदाराकडून मान्य दराने काम करून घेणेस्तव प्रस्ताव विचाराथ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात इटालियन डिझायनर पेव्हींग ब्लॉक बसविणेच्या कामात जन्ममृत्यू कार्यालय, सुरक्षा अधिकारी यांचे दालन व मा.महापौर यांचे वाहनतळाचा यात समावेश केल्यामुळे या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक रू.10,70,626/- व वाढीव काम, मुळ कंत्राटदार अरबाज कन्स्ट्रक्शन यांच्याकडून 2% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.08 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.2, मयुरपार्क व सुजाता, एकता हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.14,99,250/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्यांची लांबी 1621 मी. व रूंदी साधारण 4.50 मी. आहे. एकूण 4 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी तीन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| 1. एम. ए. सिद्यीकी | 18.86% जास्त दराने |
| 2. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 22% जास्त दराने |
| 3. ए. एस. कन्स्ट्रक्शन | 25% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी एम.ए.सिद्यीकी यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 18.86% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 9.77% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.14,99,250/- पेक्षा जास्त म्हणजेच रक्कम रू.16,45,727/- खर्च होणार आहे. पत्यक्ष चर्चेत संबंधीत गुत्तेदाराने उपरोक्त दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी एम. ए. सिद्यीकी यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 9.77% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.2, मयुरपार्क व सुजाता, एकता हौसिंग सोसायटी अंतर्गत रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 9.77% जास्त दराची एम. ए. सिद्यीकी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.09 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.26, गणेशनगर जवळील 12 मी. रूंद मुख्य रस्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.19,62,300/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील भागातील रस्त्यांचे काम यापुर्वी सिडको विभागातर्फे करण्यात आलेले आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्यांची लांबी 1195 मी. व रूंदी साधारण 5.50 मी. आहे. एकूण 5 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी चार निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| 1. ए.एस. कन्स्ट्रक्शन | 20.20% जास्त दराने |
| 2. गुरूनाननक इंडस्ट्रीज | 22% जास्त दराने |
| 3. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 22% जास्त दराने |
| 4. एम. ए. सिद्दीकी | 25% जास्तदराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी ए.एस. कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 20.20% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 13.12% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.19,62,300/- पेक्षा जास्त म्हणजेच रक्कम रू.22,19,754/- खर्च होणार आहे. प्रत्यक्ष चर्चेत संबंधीत गुत्तेदाराने उपरोक्त दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी ए. एस. कन्स्ट्रक्शन यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 13.12% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.26, गणेशनगर जवळील 12 मी. रूंद मुख्य रस्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 13.12% जास्त दराची ए.एस. कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.10 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, प्रभाग क्र.58, लक्ष्मण चावडी ते कैलासनगर स्मशानभुमी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.13,60,000/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील भागातील रस्त्याचे काम तीन वर्षापुर्वी झालेले आहे. प्रस्तावित अंदाजपत्रकात डांबरीकरण करावयाच्या रस्त्यांची लांबी 560 मी. व रूंदी साधारण 8.00 मी. आहे. एकूण 5 निविदापत्रके विकली गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी तीन निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| 1. मे. गुरूनानक इंडस्ट्रीज | 17% जास्त दराने |
| 2. पी. एम. चोरडीया | 25% जास्त दराने |
| 3. ए. एस. कन्स्ट्रक्शन | 25% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे. गुरूनानक इंडस्ट्रीज यांचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 17% ने जास्त आहेत. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 12.12% जास्त दर येत आहेत. ज्यामुळे सदर कामावर अंदाजपत्रकीय रक्कम रू.13,60,000/- पेक्षा जास्त म्हणजेच रक्कम रू.15,24,832/- खर्च होणार आहे. पत्यक्ष चर्चेत संबंधीत गुत्तेदाराने उपरोक्त दरामध्ये काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. यास मा.आयुक्त यांनी शिफारस करून स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी मे. गुरूनानक इंडस्ट्रीज यांचेकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा 12.12% जास्त दराने करून घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.58, लक्ष्मण चावडी ते कैलासनगर स्मशानभुमी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 12.12% जास्त दराची मे.गुरूनाननक इंडस्ट्रीज यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.11 :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/1107/प्र.क्र.27/सेवा-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 10 एप्रिल 2007 नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात दिनांक 1 एप्रिल 2007 पासून 6% वाढ मंजुर कलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 01.04.2007 पासून महागाई भत्ताए 29% ऐवजी 35% दराने अदा करण्यासाठी मासिक रू.14.69 लक्ष खर्च अपेक्षित आहे. सन 2007-2008 च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदीतून सदरील खर्च भागविण्यात येईल. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना एप्रिल 2007 च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात 29% ऐवजी 35% महागाई भत्ता समाविष्ट करण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/1107/प्र.क्र.27/सेवा-9, मंत्रालय, मुंबई दिनांक 10 एप्रिल 2007 नुसारऔरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 01.04.2007 पासून महागाई भत्ता 29% ऐवजी 35% दराने अदा करण्यास मंजुरी देण्यात येते. त्यानुसार एप्रिल महिन्याची महागाई भत्ता थकबाकी व मे 2007 च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात 29% ऐवजी 35% महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.12 :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रंगीनगेट वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणेच्या कामाचे र.रू.9,85,700/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम गुत्तेदार श्री.आर.बी.रूडसमुद्र यांच्याकडून 3.50% जास्त दराने करून घेण्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर कामात इनटॅक या पुराणवास्तुशी संबंधीत असलेल्या संस्थेने प्रत्यक्ष काम करतांना सुचविलेल्या संकल्पनेनुसार मुळ अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये बदल होत असून अतिरिक्त बाबींसह प्रत्यक्ष काम करतांना रक्कम रू.1,87,983/- वाढ होत असल्याने सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.11,73,683/- चे होत आहे. सदर कामास मा.आयुक्त यांनी शिफारस करून प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्याचे आदेशीत केलेले आहे.

तरी सदरील कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.11,73,683/- तसेच मुळ कंत्राटदाराकडून मान्य दराने काम करून घेणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रंगीनगेट वाहतुक बेटाचे सौंदर्यीकरण करणेच्या कामामध्ये वाढ होत असल्याने मुळ अं.प.रू.9,85,700/- व वाढीव अं.प.र.रू.1,87,983/- असे अतिरिक्त बाबींसह र.रू.11,73,683/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास तसेच सदरील वाढीव काम मुळ कंत्राटदार श्री.आर.बी.रूडसमुद्र यांचेकडून करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.13 :</u>**

मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहेत की, महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सेवा सुविधा याच बरोबर देण्यात येणारे बांधकाम परवाने, शहरातील रस्ते साफसफाई, दिवाबत्ती, जलनि:सारण व्यवस्था, आरोग्य सेवा, वाहतुक सेवा आदींची माहिती तसेच देण्यात येणारे परवाने, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, विविध स्वरूपाचे ना हरकत प्रमाणपत्र, पर्यटन सुविधा आदींबाबत महापालिकेकडे नागरिक सातत्याने संपर्क साधत असतात. अशा स्वरूपाची माहिती नागरिकांना निश्चित स्वरूपात एखाद्या सेंटर वरून प्राप्त झाल्यास नागरिक तसेच शहरात येणारे पर्यटक यांच्यासाठी ते सोयीचे होवू शकेल, तसेच मनपा प्रशासनावरील ताण कमी व्हावा या दृष्टीकोनातून दि.1/5/2006 ते 30/4/2007 या कालावधीसाठी सदरचे काम मे.सारंग एंटरप्राईजेस यांना देण्यात आले होते. सदरील संस्थेचा कराराचा कालावधी संपत असल्याने व त्यांनी वर्षभरात पुरविलेल्या सेवा सुविधा लक्षात घेता 1/5/2007 ते 30/4/2008 या कालावधीसाठी खालील प्रकारची माहिती देण्याबाबत कराराचे नुतनीकरण करण्यात यावे. मागील वर्षी सदरील कामासाठी मे.सारंग इंटरप्राईजेस यांना रू.5,95,000/- अदा करण्यात आले होते. त्यात 10 टक्के नैसर्गिक वाढ करून सदर कामासाठी रू.6,54,500/- द्यावेत अशी संस्थेने विनंती केलेली आहे.

1. महापालिकेचे विविध विभाग, महापालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा.
2. महापालिकेच्या प्रभाग कार्यालयामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा.
3. औरंगाबाद शहरातील महत्वाची पर्यटन स्थळे, ऐतिहासिक वास्तु, विविध प्रकारची संग्रहालये तसेच महापालिकेतर्फे चालविली जाणारी उद्याने, संग्रहालये-प्राणी संग्रहालय, उद्याने, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, भारत माता मंदिर, मौलाना अबुल कलाम आझाद संशोधन केंद्र, स्मृतीवन इत्यादी.
4. महापालिकेच्या एक खिडकी योजनेद्वारा देण्यात येणारे परवाने, परवानग्या व त्यासाठी लागणरी कागदपत्रांची माहिती.
5. मुलभूत सेवा सुविधांबाबत काही तक्रारी असल्यास त्या तक्रारींशी संबंधीत विभागांची माहिती देणे, तक्रारी नोंदवून घेणे व त्या संबंधीत विभागाकडे पाठविणे.
6. महापालिकेतर्फे चालविण्यात येणाऱ्या शहर बसचे मार्ग व त्यांचे वेळापत्रक नागरिकांना उपलब्ध करून देणे.

उपरोक्त बाबी पाहता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मे.सारंग इंटरप्राईजेस यांना उक्त स्वरूपाचे काम देणे योग्य राहिल.

1. उक्त स्वरूपाची माहिती देण्यासाठी संस्था औरंगाबाद शहरात स्वत:चे कार्यालय त्यांना योग्य वाटेल अशा ठिकाणी त्यांच्या इमारतीत सुरू करेल व सदरील कॉल सेंटरसाठी आवश्यक असणारे कार्यालय, कर्मचारी, फर्निचर, संगणक, टेलिफोन, इंटरनेट फॅसिलीटी व इतर आवश्यक सेवा आदी सुविधा संस्था स्वखर्चाने करून घेईल. यासाठी महापालिका कोणताही खर्च करणार नाही.
2. महापालिकेतर्फे पुरविण्यांत येणाऱ्या सेवा सुविधा आदींबाबतची सविस्तर माहिती सदरील कॉल सेंटरला महापालिका विनामुल्य पुरवेल.
3. कॉल सेंटरमार्फत पुरविण्यांत येणाऱ्या सेवा सुविधांबाबतची जाहीरात महापालिकेतर्फे करण्यात येईल.
4. मे.सारंग इंटरप्राईजेस यांना सदरचे काम एक वर्षासाठी म्हणजेच दि.1/5/2007 ते 30/4/2008 या कालावधीसाठी देण्यात येईल.
5. मे.सारंग इंटरप्राईजेस यांना, त्यांच्या कॉल सेंटर मार्फत पुरविण्यांत येणाऱ्या सेवा सुविधांपोटी महानगरपालिका मे.सारंग इंटरप्राईजेस यांना रू.6,54,500/- चार समान हप्त्यात देईल. यावरती द्यावे लागणारे शासकीय कर महापालिका अदा करेल.

6. सदरील कॉल सेंटरमार्फत नागरिकांना व पर्यटकांना महानगरपालिकेच्या कामकाजाशी व शहरातील पर्यटनाशी संबंधीत माहिती देण्यांत येईल. संस्थेच्या कामकाजाची व अनुषंगिक बाबींची जबाबदारी पुर्णत: संस्थेवर राहील.

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

| | |
|---|---|
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :हा प्रस्ताव स्थगित ठेवावा. |
| मा. आयुक्त | : माहे मे अखेरपर्यत मुदतवाढ द्यावी. |
| मा. सभापती | : माहे मे अखेरपर्यत मूदतवाढ देण्यास मंजूरी दिली जते. पुढील बैठकीत हा विषय पून्हा सादर करावा. |

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत सेवा सुविधा, मनपातर्फे पुरविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सुविधा आदींबाबत नागरिकांना निश्चित स्वरूपात प्राप्त व्हावी व नागरिक तसेच शहरात येणारे पर्यटक यांच्यासाठी ते सोयीचे होण्याकरीता सदरचे काम करणारे मे.सारंग एंटरप्राईजेस यांचेकडून सदरील काम करून घेण्यास पुढील एक महिन्याकरीता म्हणजेच माहे मे 2007 अखेर पर्यंत मुदतवाढ देण्यात येते. तद्नंतर पुन्हा हा प्रस्ताव सभागृहापुढे सादर करण्यात यावा. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.14 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, श्रेयनगर, क्रांतीचौक प्रभागांतर्गतच्या भागातील रस्त्याची दुरूस्तीसह पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.25,83,633/- चे असून या कामांतर्गत 3 कि.मी. लांबीच्या व 5 मीटर रूंदीच्या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. या कामाकरीता निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत आठ निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेस सहा निविदा प्राप्त झाल्या. त्यांचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | राजेंद्रसिंग डी.अजितसिंग | 18% जास्त |
| 2. | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 19.19% जास्त |
| 3. | के.बी.पाथ्रीकर | 19.21% जास्त |
| 4. | पी. एम. चोरडीया | 20.59% जास्त |
| 5. | मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | 21% जास्त |
| 6. | अरोरा कन्स्ट्रक्शन | 21.12% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची निविदा राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांची असून त्यांचा दर 18% जास्त आहे. डांबर खरेदीची बाजार भावाप्रमाणे दर विचारात घेऊन तुलना केली असता 7.66% जास्त दर येत आहे. सदर 7.66% जास्त दरास मा.आयुक्तांनी शिफारस करून स्थायी समिती समोर सादर करण्याचे आदेशित केले आहे. तरी श्री.राजेंद्रसिंग डी.अजितसिंग यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.66% जास्त दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्रेयनगर, क्रांतीचौक प्रभागांतर्गतच्या भागातील रस्त्याची दुरूस्तीसह पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा 7.66% जास्त दराची श्री. राजेंद्रसिंग डी. अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.15 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहरातील काही महत्वाचे व विकास योजना प्रमाणे मुख्य रस्ते Deffered Payment धर्तीवर रस्त्यांचे मजबुतीकरण, आधुनिकीकरण करण्यासाठी फेब्रुवारी 2006 मध्ये पहिल्यांदा निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यावेळेस कंत्राटदाराने भरलेला निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा सरासरी 90% जास्त होता. त्यामुळे सदर निविदा न स्विकारता कामांच्या फेरनिविदा काढण्यात आल्या. तद्नंतर सदर कामाकरीता जुन 2006 मध्ये दुसऱ्या वेळी निविदा मागविण्यात आल्या, त्यावेळेस कंत्राटदारानी भरलेला निविदा दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा 80 ते 82% जास्त दराने होता. त्यामुळे सदर निविदा स्विकारण्यात आल्या नाहीत व मा.आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार Deffered Payment धर्तीवर हाती घेतलेली सर्व कामे एकत्र करून नंतर निविदा प्रक्रिया करण्याचे आदेशित केले. त्यानुसार कामांचे एकत्रित अंदाजपत्रक तयार करून तिसऱ्या वेळी एकत्रित निविदा रक्कम रू.25.00 कोटींची निविदा जा.क्र.मनपा/अशअ/निविदा/23/2007, दिनांक 15.1.2007 अन्वये वर्तमानपत्रात जाहीरात देवून बी-1 नमुन्यात निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेस अंतिम वेळेपर्यंत एक निविदा विक्री झाली होती व अंतिम तारखेस एक निविदा प्राप्त झाली आहे. प्राप्त झालेली निविदा ही दिनांक 16.3.2007 रोजी उघडण्यात आली, ज्याचा तपशील येणे प्रमाणे आहे.

1) गुरूनानक इंडस्ट्रीज अं.प.दरापेक्षा 58% जास्त दर.

प्राप्त निविदा दर जास्त असल्याने संबंधीत ठेकेदाराकडून दर पृथ:करण मागविण्यात आले असता संबंधीत ठेकेदार यांनी 57.40% जास्त दरांचे पृथ:करण सादर केले आहे. ठेकेदारांनी दिलेल्या दरांच्या बाबतीत मनपातर्फे नियुक्तप्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.श्रीखंडे कन्सल्टंट, नवी मुंबई यांचेकडून सविस्तर Evaluation Report मागविण्यात आला असता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सदरची निविदा ही 40% जास्त दरापर्यंत मंजूर करणे शिफारस अहवाल दिला आहे.

उक्त सर्व बाबींचा विचार कयन ठेकेदार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना मा.आयुक्तांचे दालनात प्रत्यक्ष वाटाघाटीस बोलाविण्यात आले व वाटाघाटीअंती 34% जास्त दराने निविदा मंजूर करणे मा.आयुक्त यांनी शिफारस केलेली आहे. Deffered Payment धर्तीवर सदरचे काम हे निविदा प्रमाणे 18 महिन्यांत पूर्ण करावयाचे असून सदर कामावरील खर्चाचे देयक हे खालील प्रमाणे आहेत.

1) पहिले वर्ष- ठेकेदाराचे देयक मंजूर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकूण रक्कमेचे 30% हद्दीपर्यंत.

2) दुसरे वर्ष- ठेकेदाराचे देयक मंजूर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकूण रक्कमेचे 30% हद्दीपर्यंत.

3) तिसरे वर्ष- ठेकेदाराचे देयक मंजूर केल्यानंतर केलेल्या कामाचे एकूण रक्कमेचे 40% हद्दीपर्यंत.

सदर कामांसाठी डिफेक्ट लायबिलीटी कालावधी हा 3 वर्षांचा आहे.

तरी प्रकरणी सदर कामाची निविदा 34% जास्त दराने मान्य करणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील काही महत्वाचे व विकास योजना प्रमाणे मुख्य रस्ते Deffered Payment धर्तीवर रस्त्यांचे मजबुतीकरण, आधुनिकीकरण करण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदानुसार, निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्याप्रमाणे सदरील काम **गुरूनानक इंडस्ट्रीज** यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 34% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.16 :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वेदांतनगर अंतर्गत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक र.रू.25,05,519/- चे असून यामध्ये 1455 मी. लांबीचे व 6.50 मी. रूंदीचे डांबरीकरण करण्याचे प्रस्तावित आहे. या कामासाठी निविदा मागविल्या असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| 1. | मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन | 12% जास्त |
| 2. | मे. गुरूनानक इंडस्ट्रीज | 22% जास्त |
| 3. | ए. एस. कन्स्ट्रक्शन | 23.81% जास्त |

प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12% जास्त दराने आहे. बाजार भावातील डांबराचे दर विचारात घेवून तुलना केली असता, दरवाढ ही 12.73% जास्त येत आहे. मे.आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12% जास्त दराची निविदा भरलेली असून सदर दर हा दरवाढीपेक्षा कमीच आहे.

तरी मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा 12% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वेदांतनगर अंतर्गत रस्त्यांचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 12% जास्त दराची मे. आदीनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

‘‘राष्ट्रगीता’’ नंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद